आधुनिक केसरी

शुक्रवार, 22 जुलै 2022
किंमत 5 रुपये | औरंगाबाद (महाराष्ट्र)
मराठी दैनिक
वर्ष - 01 अंक - 315
Title Code : MAHMAR51117

MARATHI • DAINIK • AURANGABAD (MAHARASHTRA) • FRIDAY 22 JULY 2022 | adhunikkesari.com | Adhunik Kesari | YEAR-01 • ISSUE-315 • TITLE CODE : MAHMAR51117 • PAGE-10 • PRICE-5


# द्रौपदी मुर्मू नव्या राष्ट्रपती

## यूपीए पुरस्कृत उमेदवार यशवंत सिन्हा यांचा केला पराभव

आधुनिक केसरी न्यूज

**नवी दिल्ली : देशात सोमवारी पार पडलेल्या राष्ट्रपती निवडणुकीचा निकाल स्पष्ट झाला आहे. या निवडणुकीत एनडीए पुरस्कृत उमेदवार द्रौपदी मुर्मू विजयी झाल्या असून यूपीए पुरस्कृत उमेदवार यशवंत सिन्हा पराभूत झाले आहेत. या निवडणुकीसाठी ९९ टक्के लोकप्रतिनिधींनी आपला मतदानाचा हक्क बजावलेला होता. देशातील १० राज्ये आणि एका केंद्रशासित प्रदेशात १०० टक्के मतदान पार पडले होते. राष्ट्रपतीपदासाठी ७७१ खासदार आणि ४०२५ आमदारांसह ४७९६ मतदारांनी आपला मतदानाचा हक्क बजावला. मतमोजणीच्या पहिल्या फेरीपासूनच मुर्मू आघाडीवर होत्या. तिसऱ्या फेरीपर्यंत मुर्मू यांना वैध मतांपैकी ५० टक्के मते मिळाली.**

राष्ट्रपतीपदाच्या निवडणुकीत चांगलीच चुरस निर्माण झाली होती. अधिकाधिक पाठिंबा मिळावा म्हणून मुर्मू आणि यशवंत सिन्हा यांनी देशभर दौरे केले होते. मात्र या निवडणुकीमध्ये मुर्मू यांचा विजय झाला. या विजयासह मुर्मू यांना देशाच्या दुसऱ्या महिला राष्ट्रपती होण्याचा मान मिळाला आहे. त्या येत्या २५ जुलै रोजी राष्ट्रपतीपदाचा पदभार स्वीकारतील. याआधी प्रतिभाताई पाटील यांना पहिल्या महिला राष्ट्रपती होण्याचा मान मिळाला होता.

दुसऱ्या फेरीत ८१२ मतांच्या फरकाने आघाडीवर

मतमोजणीला सुरुवात झाल्यानंतर सुरुवातीपासूनच द्रौपदी मुर्मू आघाडीवर होत्या. मतमोजणीच्या दुसऱ्या फेरीत त्या ८१२ मतांच्या फरकाने आघाडीवर आहेत. मुर्मू यांना दुसऱ्या फेरीपर्यंत १३४९ मते मिळाली. या मतांचे मूल्य ४,८३,२९९ आहे. तर दुसऱ्या फेरीपर्यंत सिन्हा यांना ५३७ मते मिळाली होती. या मतांचे मुल्य १,८९, ८७६ आहे.

**१७ खासदारांची मते फुटली**

राष्ट्रपतीपदाच्या या निवडणुकीत देशभरातील एकूण १७ खासदारांची मते फुटली आहेत. या खासदारांनी एनडीए पुरस्कृत उमेदवार द्रौपदी मुर्मू यांच्या बाजूने मतदान केले. परिणामी मुर्मू शेवटपर्यंत आघाडीवर राहिल्या आणि त्यांचा विजय झाला.



### मुर्मू यांना मिळाली ५० टक्क्यांपेक्षा जास्त मते

मतमोजणीच्या तिसऱ्या फेरीत कर्नाटक, केरळ, मध्य प्रदेश, महाराष्ट्र, मणिपूर, मेघालय, मिझोरम, नागालँड, ओदिशा आणि पंजाब या राज्यातील लोकप्रतिनिधींनी दिलेल्या मतांची मोजणी करण्यात आली. या फेरीत एकूण १३३३ मते वैध ठरली. यातील ८१२ मते मुर्मू यांना तर ५२१ मते सिन्हा यांना मिळाली. मतमोजणीच्या तिसऱ्या फेरीपर्यंत ३२१९ मते वैध ठरली. या मतांचे मूल्य ८,३८,८३९ एवढे ठरले. तिसऱ्या फेरीपर्यंतच्या वैध मतांपैकी मुर्मू यांना २१६१ मते मिळाली, ज्याचे मूल्य ५,७७,७७७ एवढे आहे. तर सिन्हा यांना १०५८ मते मिळाली. या मतांचे मूल्य २६१०५२ एवढे आहे. म्हणजेच तिसऱ्या फेरीपर्यंत वैध मतांपैकी ५० टक्क्यांपेक्षाही जास्त मते मुर्मू यांना मिळाली.



# सोनिया गांधींच्या ईडी चौकशीवरुन काँग्रेस आक्रमक

## दिल्ली, मुंबईसह कार्यकर्त्यांचे देशव्यापी आंदोलन

आधुनिक केसरी न्यूज

**नवी दिल्ली :** नॅशनल हेराल्ड प्रकरणात अंमलबजावणी संचालनालयाने (ईडी) काँग्रेसच्या अध्यक्षा सोनिया गांधी यांना समन्स बजावलेले आहे. ईडीकडून सुरु झालेल्या या चौकशीच्या निषेधार्थ काँग्रेसने आक्रमक भूमिका घेतली आहे. दिल्ली, मुंबईसह काँग्रेसकडून देशव्यापी आंदोलन करण्यात येत आहे. अनेक ठिकाणी कार्यकर्ते रसत्यावर उतरत ईडी आणि मोदी सरकारविरोधात घोषणाबाजी करताना दिसत आहे.

सोनिया गांधी आणि राहुल गांधी यांच्यावर सुरु असलेली कारवाई म्हणजे राजकीय सूड असल्याचा आरोप काँग्रेसने केला आहे. या अगोदरही राहुल गांधी यांची ईडीकडून चौकशी सुरु असताना काँग्रेसकडून देशभरात आंदोलन करण्यात आली होती.

**काँग्रेस नेत्यांचा पक्ष मुख्यालयापासून संसदेपर्यंत मोर्चा**

सोनिया गांधी यांच्या ईडी चौकशी विरोधात काँग्रेस नेते आणि खासदारांनी अकबर रोड येथील पक्षाच्या मुख्यालयापासून संसदेपर्यंत मोर्चा काढला आहे. तसेच पटना, बिहारमध्येही काँग्रेस कार्यकर्ते आक्रमक झाल्याचे पहायला मिळत आहे.

सोनिया गांधी आणि राहुल गांधी यांच्यावर सुरु असलेली कारवाई म्हणजे राजकीय सूड असल्याचा आरोप काँग्रेसने केला आहे. तपास यंत्रणा मोदी सरकारच्या कठपुतली बाहुल्या झाल्या असून सरकारच्या इशाऱ्यावर त्या केवळ विरोधी पक्षांच्या नेत्यांवरच कारवाई करत असल्याचा आरोप काँग्रेस नेत्यांनी केला आहे.

केंद्र सरकार ईडीसह केंद्रीय संस्थांचा गैरवापर करत आहे. लोकशाही धोक्यात आल्याचे हे लक्षण आहे. आमची लढाई देश वाचवण्यासाठी असल्याची टीका राजस्थानचे मुख्यमंत्री अशोक गेहलोत यांनी केली आहे.

**भाजपाकडून तपास यंत्रणांचा गैरवापर**

भाजपाकडून देशात तपास यंत्रणांचा गैरवापर होतो आहे. मला तुम्ही एका भाजपा नेत्याचे नाव सांगा, ज्यांना ईडीने चौकशीसाठी बोलावले आहे. जेव्हा जेव्हा देशात भाजपाविरोधी वातावरण होते, तेव्हा तेव्हा ते गांधी परिवाराला त्रास द्यायला सुरूवात करतात. देशात जे सुरू आहे, ते योग्य नाही. हे सर्व बदलण्याची गरज आहे, असे रॉबर्ट वाड्रा म्हणाले.

# अविवाहित महिलांना २४ आठवड्यांपर्यंत गर्भपात करता येईल : सर्वोच्च न्यायालय

आधुनिक केसरी न्यूज

**नवी दिल्ली :** सर्वोच्च न्यायालयाने गुरुवारी अविवाहित महिलांना २४ आठवड्यांपर्यंत गर्भपात करण्याची परवानगी दिली आहे. महिलेच्या जीवाला धोका नसेल तर २४ आठवड्यानंतर गर्भपात केला जाऊ शकतो, असे ऑल इंडिया इन्स्टिट्यूट ऑफ मेडिकल सायन्सेसच्या (एम्स) वैद्यकीय मंडळाने म्हटले होते. या पार्श्वभूमीवर न्यायमुर्ती चंद्रचुड यांच्या खंडपीठाने हा निर्णय दिला.

या प्रकणाच्या सुनावणी वेळी न्यायालयाने वैद्यकीय गर्भपात नियामांतील तरतुदींबाबत दिल्ली उच्च न्यायालयाने दिलेल्या निर्णयाला अवैध ठरवले आहे. तसेच गर्भपाताबाबत ज्या सुविधा विवाहित महिलांना दिल्या जातात, त्या अविवाहित महिलांनी दिल्या जाव्यात, असेही सर्वोच्च न्यायालयाने म्हटले आहे. तसेच न्यायालयाने विधवा आणि घटस्पोट झालेल्या महिलांनाही २० ते २४ आठवड्यांनंतर गर्भपात करण्याची परवानगी दिली आहे.



गर्भपात करणे हे संविधानाच्या विरोधात आहे. महिला केवळ अविवाहित असल्याने तीला कायद्यांतर्गत सुविधा नाकारता येणार नाहीत. विवाहित आणि अविवाहित महिलांमध्ये भेदभाव करता येणार नाही, असे न्यायालयाने म्हटले आहे.

दरम्यान, काही दिवसांपूर्वी उच्च न्यायालयाने अशाच एका प्रकरणात निर्णय देताना अविवाहित महिलेचा गर्भपात वैद्यकीय गर्भपात नियम २००३ अंतर्गत येत नाही, असे निरीक्षण नोंदवले होते.







# बिल गेट्स, अंबानींना मागे टाकत अदानी जगातील चौथे सर्वात श्रीमंत व्यक्ती

आधुनिक केसरी न्यूज


**नवी दिल्ली :** फोर्ब्सने जगातील श्रीमंतांची यादी जाहीर केली आहे.



या यादीनुसार अदानी समुहाचे अध्यक्ष गौतम अदानी हे मायक्रोसॉफ्टचे सह-संस्थापक बिल गेट्स यांना मागे टाकत जगातील चौथे सर्वात श्रीमंत व्यक्ती बनले आहे. त्यांची संपती ११५.५ अब्ज डॉलरपर्यंत पोहोचली आहे. तर बिल गेट्स यांची संपत्ती १०४.६ अब्ज डॉलर आहे. या यादीत भारतीय उद्योगपती मुकेश अंबानी दहाव्या स्थानावर आहेत. मुकेश अंबानी यांची एकूण संपत्ती ९० अब्ज डॉलर्स आहे. तर टेस्ला आणि स्पेसएक्स सारख्या कंपन्यांचे संस्थापक एलोन मस्क हे २३५.८ अब्ज डॉलर्ससह पहिल्या स्थानावर आहे.

गेल्या दोन वर्षांत अदानी समुहाचे काही शेअर्स ६०० टक्क्यांपेक्षा जास्त वाढले आहेत. यामध्ये ग्रीन एनर्जीशी संबंधित काही स्टॉक्सचाही समावेश आहे. अदानी समुहाने अवघ्या तीन वर्षांत सात विमानतळांवर आणि भारतातील सुमारे एक चतुर्थांश हवाई वाहतुकीवर नियंत्रण मिळवले आहे. अदानी समूहाकडे आता देशातील सर्वात मोठे विमानतळ ऑपरेटर, पॉवर जनरेटर आणि बिगर-राज्य क्षेत्रातील सिटी गॅस रिटेलर आहे. दरम्यान, अदानी एंटरप्राइझ लिमिटेडने 26 जुलै रोजी 5G स्पेक्ट्रमच्या लिलावात सहभागी होण्यासाठी अर्ज केला आहे.




विश्वास देशपांडे
संपर्क क्र. 9403749932

# टागोरांचे भावविश्व संपन्न करणाऱ्या दोन स्त्रिया

आधुनिक केसरी

रवींद्रनाथांनी तिचे नाव नलिनी ठेवले. आणि नलिनी ही त्यांची काव्यप्रेरणा ठरली. त्यांच्या अनेक कविता तिच्यावरच्या प्रेमातून स्फूर्ती घेऊन जन्माला आल्या आहेत. पुढे दोन महिन्यांनी टागोर इंग्लंडमध्ये गेले. पण त्यांची आणि नलिनीची ही प्रेमकहाणी फुलली नाही. नलिनी उर्फ अनाने नंतर बडोदा येथील कॉलेजमध्ये व्हाईस प्रिन्सिपॉल असलेले हॅराल्ड लिट्लहेड यांच्याशी विवाह केला. आणि पुढे ते दोघे इंग्लंडमधील एडिंबर्ग येथे स्थायिक झाले. पण आजारामुळे अना जास्त काळ जगली नाही. वयाच्या अवघ्या ३३ व्या वर्षी तिचा दुर्दैवी मृत्यू झाला. असे म्हणतात की आत्माराम पांडुरंग म्हणजे तिच्या वडिलांच्या मनात तिचा विवाह रवींद्रनाथांशी करून द्यावा असे होते. पण रवींद्रनाथांचे थोरले बंधू सत्येंद्रनाथ याना त्या दोघातील वयाचे अंतर मान्य नव्हते. त्यामुळे त्यांनी हा प्रस्ताव नाकारला.

पण जरी अनाशी विवाह होऊ शकला नाही तरी तिने म्हणजेच नलिनीने टागोरांचे भावविश्व शेवटपर्यंत व्यापले होते. तिची स्मृती त्यांच्या मनात शेवटपर्यंत जागृत होती. त्या दोघांच्या एकमेकांवरील असलेल्या प्रेमातून रवींद्रनाथांच्या अनेक अक्षर कवितांचा जन्म झाला आहे.

पुढे रवींद्रनाथ इंग्लंडला गेल्यावर स्कॉट कुटुंबात राहिले. स्कॉट पती पत्नी आणि त्यांच्या दोन मुली असे हे चौकोनी कुटुंब होते. स्कॉट कुटुंब अतिशय प्रेमळ होते. स्कॉटबाईंनी टागोरांना खूप जीव लावला. त्यांच्यावर मुलाप्रमाणे प्रेम केले. भारतीय स्त्रीचेच आपल्या कुटुंबावर, पतीवर प्रेम असते हा रवींद्रनाथांचा गैरसमज या कुटुंबात राहिल्याने दूर झाला. आई, मग ती भारतीय असो वा पाश्चिमात्य, तिचे आपल्या मुलांवर सारखेच प्रेम असते या विश्वभावनेचा प्रत्यय त्यांना या कुटुंबात राहिल्याने आला. टागोरांच्या पुढील आयुष्यात त्यांच्यामधील संगीतकारात जो भारतीय आणि पाश्चात्य संगीताचा संगम दिसतो त्याचे मूळ ते या कुटुंबात राहिले होते इथे आहे. स्कॉट यांच्या दोन्ही मुली संगीतात प्रवीण होत्या. त्यांनी रवींद्रनाथांना पाश्चात्य संगीत शिकवले. ते असे या कुटुंबात रमले असतानाच, त्यांना त्यांच्या कुटुंबियांकडून भारतात परत येण्याबद्दल सांगितले गेले. या वेळी रवींद्रनाथांना निरोप देताना स्कॉट बाईंना आपले अश्रू आवरता आले नाहीत. त्यावेळी त्या म्हणाल्या, ' एवढा जीव लावून लगेच जायचे होते, तर आलासच कशाला?' या प्रसंगातून रवींद्रनाथांना स्त्री हृदयातील प्रेमाची, वात्सल्याची अनुभूती आली. आणि एका परीने त्यांचे भावविश्व संपन्न होण्यास मदत झाली.



# आनंदी पहाट

## भावनिक त्रयस्थता ठेवायला शिकावे

आधुनिक केसरी

आपल्या प्रत्येकाच्या जीवनात असंख्य अपमान, नाराजी, नैराश्य, गैरसोयी, अस्वस्थ करणारे प्रसंग, विपरीत परिस्थिती ह्यांना आपण तोंड देत असतो. काहीवेळा अशी परिस्थिती आपल्या नियंत्रणाच्या बाहेर असण्याचीच शक्यता अधिक असते. खरे तर, ह्यामध्ये भावनिक अडथळेच अधिक असतात. आपण अनुभवत असलेल्या अनेक घटना आणि घडत असलेल्या घडामोडीशी आपल्या भावनांचा संबंध अनावधानाने आपण स्वतःच जोडत असतो. आपल्या कुवतीनुसार, पात्रतेनुसार जे काही शक्य आहे ते बदलण्याचा आपणच प्रयत्न करायला हवा; अथवा प्राप्त परिस्थितीचा हसतमुखाने स्वीकार करण्याचे कौशल्य आत्मसात करावे.



विद्यावाचस्पती विद्यानंद
संपर्क क्र. 7709612655

आपल्या आयुष्यात घडणाऱ्या अनेक गोष्टी आपण व्यक्तिशः घेत असतो. त्या व्यक्तिगत आणि वैयक्तिक पातळीवर घ्यायचे टाळावे. आपण काही प्रमाणांत मानसिक, भावनिक त्रयस्थता ठेवायला शिकले पाहिजे. साक्षीभावाने माणसे, प्रसंग, घटना अनुभवायचा प्रयत्न करत राहावे. अर्थात साक्षीभाव म्हणजे भावनाशून्यता अथवा निष्ठुरता असणे असे नव्हे तर शांतपणे, परिस्थिती न्याहाळण्याची, अवलोकन करण्याची ती कला आहे, ती आपण आत्मसात करावी; जेणेकरून प्रत्येकवेळी आपण आत्मकेंद्रित होत नाहीत.

आपला भूतकाळ आणि भूतकाळातील अनेक घटना आपण सहजपणे विसरायला तयार नसतो. जे घडून गेले तो आपला भूतकाळ होता. त्यामुळे भूतकाळ विसरून वर्तमानात जगण्यापलीकडचे जीवन जगायची कला शिकून घेतली पाहिजे; आनंदप्राप्तीचा नवा पर्याय त्यायोगे उपलब्ध होतो. हे अनेकदा कळत असते पण वळत नसते म्हणूनच जे काही आपल्याला अभिप्रेत आहे तेच नेमके आपल्याला फळत नसते.




आधुनिक केसरी

## आता कैसी वारी | संसाराची ? ।।

मौनात करावे । हरिचे चिंतन ।।
आत्मा चिरंतन । हरिपाठी ।। १ ।।

देहास जडावा । सगुणाचा संग ।।
मनास सत्संग । निर्गुणाचा ।। २ ।।

आता रात्रंदिन । गावू गुण वाचे ।।
ज्ञाना-तुका नाचे । अभंगात ।। ३ ।।


पाप-पुण्य काय । ठाव म्या पामरा ।।
कर्माचा पसारा । विठुवरी ।। ४ ।।

होऊनी निस्संग आलो । तुझ्या दारी ।।
आता कैसी वारी । संसाराची ? ।। ५ ।।



प्रा.ज्ञानेश्वर कुलकर्णी (वतनी)
संपर्क क्र. ९४०३०२९१७८

# सद्गुरू सांगेल त्याप्रमाणे वागावे




आधुनिक केसरी

शुद्ध भावना म्हणजे मोबदला न घेण्याची किंवा फलाशा सोडण्याची इच्छा. भक्ति ही अशी निरपेक्ष असावी. देवालये बांधली, देवांचे पूजन-अर्चन केले, म्हणजे भक्ति निरपेक्ष केली असे नव्हे.

देवाचे करीत असताना, जप करीत असताना,त्यापासून काही हवे आहे असे न वाटले पाहिजे. तुम्ही सर्व लोक भजन पूजन करता, परंतु हे सर्व कसे होऊन बसले आहे? जसे भांडे कुठे ठेवावे, पळी ताम्हन कुठे ठेवावे, वगैरे जे शास्त्रात लिहिलेले असते ते सर्व, माणूस तोंडाने म्हणत असतो आणि करीत असतो. कारण त्यामुळे त्याला कृती करणे सोपे जाते. तसे आपण देवाचे करतो. परंतु ते केवळ केले पाहिजे म्हणून, ती आपल्या घरातली एक प्रथा आहे म्हणून; आपल्याला देव आवडतो म्हणून नव्हे. एक मुलगा होता, त्याला त्याच्या वडिलांची पत्रे येत असत. तो पत्र वाची आणि देव्हार्यात ठेवून देई. दुसरे पत्र आले की ते वाची, आणि मागले पत्र काढून टाकी. एकदा वडिलांनी पंचवीस रुपये मागितले. मुलाने ते पत्र वाचले आणि नेहमीप्रमाणे पूजेत नेऊन ठेवले. नंतर काही दिवसांनी वडिलांकडून एक गृहस्थ आला आणि म्हणाला, "तुला तुझा वडिलांचे पत्र मिळाले का ?" त्यावर तो म्हणाला"हो." त्यावर त्या गृहस्थाने विचारले,"अरे, मग पैसे का पाठविले नाहीस वडिलांना ?" त्यावर तो म्हणाला, "तेवढेच राहिले बघा !" तसे आपले होते. आपण कृती करतो, पूज्यभाव वगैरे ठेवतो, परंतु सद्गुरूने सांगितलेले तेवढे करीत नाही. त्यामुळेच आपली सत्कर्मे ही आपला अहंकार कमी व्हायला कारणीभूत न होता, उलट अहंपणा वाढवायलाच मदत करतात. म्हणून सद्गुरूने सांगितलेले साधनच आपण प्रामाणिकपणे, संशयरहित होऊन करावे.

त्याकरिता व्यवहार सोडण्याची जरूर नाही. आपण व्यवहाराला सोडू नये, पण व्यवहारात गुंतू नये. युद्धात सारथ्याच्या हाती सर्वकाही असते. तो लगाम हाती घेऊन जागृतपणे उभा असतो, आणि योग्य वाटेल तेथे रथ नेऊन उभा करतो. युद्धकर्त्याचे काम फक्त बाण अचूक दिशेला किंवा व्यक्तीवर सोडणे. त्याप्रमाणे, आपले सर्व जीवन एकदा सद्गुरूच्या ताब्यात दिल्यावर, तो सांगेल त्याप्रमाणे वागणे हेचआपले कर्तव्य ठरते.




# जिवतीच्या प्रतिमेचा भावार्थ

आधुनिक केसरी

मानवाला अनादी काळापासून घडणाऱ्या घटनांचं कौतुक आणि त्याबद्दल उत्सुकता आहे. याच उत्सुकतेमधून तो नवनवीन आविष्कार आणि गूढ घटना यांबद्दल आदरभाव दाखवत आलेला आहे. या आदराचं रूपांतर त्या अनाकलनीय गूढाचा सत्कार व पूजन करण्यात झालं. यातूनच ते गूढ पिढ्यांपिढ्या पुजल्या जाऊ लागलं . असाच एक गूढ दार पिढ्यांनी पुजलं ते 'जिवती पूजन' या रूपात. कोण ही जिवती? हिच्या पूजनाचा हेतू काय? जिवती प्रतिमेचा नेमका भावार्थ काय? असे बरेच प्रश्न मनात रेंगाळत होते. यासंदर्भात मला जे काही कळलं ते आपल्या पर्यंत पोहोचवण्यासाठी हा लेखन प्रपंच.

आषाढ महिन्याच्या अमावस्येला हे दीपपूजन केलं जातं आणि याच दिवशी जरा-जिवंतिका पूजन सुद्धा करतात. दिवा हे ज्ञानाचं, वृधिंगतेच प्रतीक आहे. अज्ञानाचा नाश करून ज्ञानाकडे जाणाऱ्या मार्गाचा मुख्य आधार आहे दीप. तुम्ही एक दिवा उजळा त्यावरून तुम्ही हजारो दिवे उजळू शकता त्यामुळेच याला वंश वृद्धीचं प्रतीक मानतात. या प्रतीकाचं पूजन म्हणजेच आजचं दीपपूजन. आजची दुसरी पूज्य देवता म्हणजे जिवती. जिवतीची प्रतिमेच्या रूपात पूजा केली जाते. आजपासून संपूर्ण श्रावण महिना या प्रतिमेच पूजन मातृशक्तीकडून केलं जातं व आपल्या अपत्यांच्या मंगलतेची प्रार्थना केली जाते. ही प्रतिमा विशेष अर्थपूर्ण आहे. या एकाच प्रतिमेत चार वेगवेगळ्या देवतांच्या, वरवर पाहता परस्परांशी संबंध नसलेल्या स्वतंत्र प्रतिमा आहेत. संपूर्ण महाराष्ट्रात याच प्रतिमेचे पूजन केले जाते. यातील एकही प्रतिमा बदललेली दिसत नाही. काय रहस्य असेल या प्रतिमा क्रमाचे? जिवती प्रतिमेत नरसिंह, कालियामर्दन करणारा कृष्ण, मुलांना खेळवणाऱ्या जरा- जिवंतिका आणि सगळ्यात खाली बुध - बृहस्पती (गुरु) यांचा समावेश असतो. याच क्रमात त्यांना पुजल्या जाते.

प्रथम भगवान नरसिंहचं का?

भगवान विष्णूंचा चवथा अवतार असलेले नरसिंह, आपल्या बाळ भक्तासाठी प्रगट झाले. ही कथा आपल्या सर्वांना परिचयाची आहे. बाळ प्रल्हादाचे हिरण्यकशिपू पासून म्हणजेच दैत्यांपासून रक्षण करणे याच मूळ उद्देशाने भगवंताने हा अवतार धारण केला. बालकांचा रक्षक आणि बाल भक्तासाठी अवतार धारण केलेली देवता म्हणून भगवान नरसिंह या प्रतिमेत पुजले जातात. त्यानंतर येतात कालियामर्दन करणारा श्रीकृष्ण. यातील नाग आणि गोपाळकृष्ण दोन्हीपण श्रावणातील आराध्य दैवत. मग नाग प्रतिमा वेगळी आणि कृष्ण प्रतिमा वेगळी न देता कालियामर्दन करणारा श्रीकृष्णच का? आपण जर कालियामर्दन प्रसंगाचा विचार केला तर लक्षात येईल की या प्रसंगात कृष्ण आणि त्याचे मित्र खेळात असतांना त्यांचा चेंडू यमुनेच्या डोहात गेला आणि कृष्णाने तो परत आणला. खेळणाऱ्या- बागडणाऱ्या मुलांवर आलेला वाईट प्रसंग कृष्णाने दूर केला. तसेच कालियाला न मारता त्यालाही अभय देऊन दूर जाण्याचा आदेश दिला. नाग हा सरटपटणाऱ्या प्राण्यांमध्ये मुख्य. सरपटणाऱ्या प्राण्यांपासून वाचवणारा, त्याचबरोबर महत्त्वाच्या प्राण्यांना अभय देणारा, खेळात बागडत असतांना बालकांवर आलेल्या वाईट प्रसंगातून वाचवणारा कृष्ण येथे कालियामर्दन रूपात पुजला जातो.

नरसिंह घरात ओढवणाऱ्या आपत्तीपासून बाळाचा बचाव करतात जसे उंचावरून पडणे, अन्नातून कधी विषबाधा होणे, आगीपासून होणारी हानी इत्यादी आणि कालियादमनक कृष्ण बाहेरच्या आपत्तीपासून जसे खेळतांना येणाऱ्या आपत्ती, पाण्यापासूनचे संकट, सरपटणाऱ्या प्राण्यांचे भय इत्यादींपासून बचाव करतात.

(उर्वरित भाग उद्याच्या अंकात)

# गणेशोत्सव-दहीहंडी निर्बंधमुक्त

## मंडळांना सवलती, गणेशमूर्तींच्या उंचीवरही शिंदेंचा मोठा निर्णय

आधुनिक केसरी न्यूज



**मुंबई :** गेली दोन वर्ष कोरोनामुळे सर्व सणांवर निर्बंध आणि मर्यादा होत्या पण यावर्षी मात्र कोणत्याही सणांवर निर्बंध नसणार आहेत. गणेशोत्सव आणि दहीहंडीचा सण निर्बंधांविना दणक्यात साजरा होईल असे सांगतानाच गणेश मंडळांना नोंदणी शुल्कात सूट देण्याचा निर्णय नव्या सरकारने घेतलेला आहे तसेच गणेशमूर्तींच्या उंचीवर कोणतेही बंधन नाही, अशी मोठी घोषणा मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी केली आहे.
आगामी गणेशोत्सव आणि दहीहंडी सणाच्या अनुषंगाने आज मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस तसेच पोलिस दलातील वरिष्ठ अधिकारी यांच्यामध्ये महत्त्वपूर्ण बैठक पार पडली. या बैठकीनंतर शिंदे-फडणवीसांनी सणांच्या संदर्भाने घेतलेल्या निर्णयाची माहिती माध्यमांना दिली.

**गणेश मंडळांना नोंदणी शुल्कात सूट, मूर्तीच्या उंचीवर कोणतेही बंधन नाही**

मंडपाच्या परवानग्या सुटसुटीत करण्यात आल्या आहेत. एक खिडकी योजना आणि ऑनलाईन पद्धत करण्यात आलेली आहे, जेणेकरुन गणेश मंडळ पदाधिकाऱ्यांना त्रास होणार नाही. तसेच मंडळांना नोंदणी शुल्क भरावे लागू नयेत, हमीपत्रही घेऊ नका असं पोलिसांना सांगितले आहे. गणेश मूर्ती उंचीवरील मर्यादा काढून टाकली आहे तसेच विसर्जन घाटांवर दिव्यांची व्यवस्था आणि मूर्ती बनवण्यासाठी जागा उपलब्ध व्हाव्यात, ही मूर्तीकारांची मागणी देखील मान्य केली असल्याचे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी सांगितले. तसेच गणेश मूर्तीचे आगमन आणि विसर्जन मिरवणुका देखील दणक्यात करण्यास शासनाची परवानगी असेल, असेही मुख्यमंत्र्यांनी यावेळी सांगितले.
यावर्षी सर्व मंडळांचा उत्साह आणि मर्यादा लक्षात घेऊन दहिहंडी, गणेशोत्सव आणि मोहरम उत्साहात साजरे झाले पाहिजेत. समाजप्रबोधन, ऐक्याचे दर्शन घडावे, यासाठी आपण सण साजरे करत असतो. पण सण साजरे करत असताना कायदा सुव्यवस्था राखली जावी. यासाठी पोलीस, जिल्हा प्रशासनाला सूचना दिल्या आहेत. गणेशोत्सव आणि इतर सण सुरळीत पार पाडावे, आगमन-विसर्जन मार्गाची व्यवस्था, यंत्रणांना तातडीने दुरुस्तीच्या सूचना, कोणाची गैरसोय होऊ नये यासाठी आज पोलिस प्रशासनाला आवश्यक सूचना दिलेल्या आहेत.
दहींहंडी साजरी करताना नियमांचे पालन करा. नियमांचे उल्लंघन होणार नाही याची काळजी घ्या. पोलिस प्रशासनाला सहकार्य करा. शेवटी नियमांचे पालन होऊन सण साजरे व्हावेत, अशी सरकारची अपेक्षा असल्याचे मुख्यमंत्री म्हणाले.



# अन् अचानक मुख्यमंत्री एकनाथ शिंदेंच्या घरासमोर आदित्य ठाकरेंचा ताफा थांबला

आधुनिक केसरी न्यूज

**ठाणे :** शिवसेनेत फूट पडल्यानंतर, एकनाथ शिंदेंनी मुख्यमंत्री होत थेट शिवसेनेवरच दावा केल्यानंतर आता ठाकरे कुटुंब प्रचंड सक्रिय झाले आहे. युवासेना प्रमुख आदित्य ठाकरेंनी शिवसंवाद यात्रा सुरू केली आहे. बंडखोर आमदारांच्या मतदारसंघात तिथल्या शिवसैनिकांच्या भेटीगाठी घेण्याचा, त्यांचाशी संवाद साधण्याचा सपाटाच ठाकरेंनी लावला आहे. शिवसंवाद यात्रेच्या अंतर्गत आदित्य ठाकरे आज ठाण्यात होते. ठाण्यामध्ये एकनाथ शिंदेंचे वर्चस्व आहे. महापालिकेतील शिवसेनेच्या ६६ नगरसेवकांनी शिंदे गटात प्रवेश केला आहे. त्यामुळे ठाण्यातील आदित्य ठाकरेंच्या शिवसंवाद यात्रेकडे राजकीय वर्तुळाचे लक्ष लागले होते. ठाण्यात ठिकठिकाणी आदित्य यांचे शिवसैनिकांनी स्वागत केले. आनंद दिघे यांचे पुतणे केदार दिघेंनीदेखील आदित्य यांचे स्वागत केले. विशेष म्हणजे आदित्य यांनी त्यांची कार मुख्यमंत्री एकनाथ शिंदेंच्या घरासमोर थांबवली. तिथे कार्यकर्त्यांची मोठी गर्दी होती. त्यांच्याशी आदित्य यांनी संवाद साधला आणि त्यानंतर पुढील कार्यक्रमासाठी रवाना झाले.
शिवसैनिकांशी संवाद साधताना आदित्य यांनी नाव न घेता एकनाथ शिंदेंचा समाचार घेतला. खाऊन खाऊन अपचन झालेले लोक सोडून गेले आहेत, अशा शब्दांत आदित्य यांनी शिंदेंवर शरसंधान साधले. बंड आणि उठाव असे शब्द वापरले जात आहेत. पण हे बंड किंवा उठाव नव्हे, ही गद्दारी आहे, अशी घणाघाती टीका आदित्य यांनी केली.
मी लहानपणापासून बघत आलो आहे. जे लोक हक्काने घरी यायचे. कामे घेऊन यायचे, नवीन जबाबदारी मागायचे. कुटुंबातील सदस्यांप्रमाणे त्यांना शिवसेनेने आजवर सांभाळले. त्यांनीच आज पाठीत खंजीर खुपसला. ज्या शिवसेनेने त्यांना भरभरून दिले, त्याच पक्षाशी त्यांनी गद्दारी केली, अशा शब्दांत आदित्य बंडखोरांवर बरसले. अडीच वर्षांच्या सत्ताकाळात कोणताही भेदभाव न करता विकासकामे केली. या कालावधीत राजकारण केले नाही तेच आमचे चुकले, असे आदित्य ठाकरे म्हणाले.

# प्रफुल्ल पटेल ईडीच्या रडारवर, मुंबईतील पॉश घरावर टाच

आधुनिक केसरी न्यूज



**मुंबई :** राष्ट्रवादी काँग्रसचे नेते खासदार प्रफुल्ल पटेल यांच्यावर ईडीने कारवाई केली आहे. प्रफुल्ल पटेलांचे मुंबईतील सीजे हाऊसमधील घरही ईडीकडून जप्त करण्यात आलं आहे. इक्बाल मिरची प्रकरणी ईडीने प्रफुल्ल पटेलांवर ही कारवाई केली आहे. यासंबंधीत प्रफुल्ल पटेलांची चौकशीही झाली होती. मुंबईतील सीजे हाऊसमधील चौथ्या मजल्यावरील प्रफुल्ल पटेलांच्या घरावर ईडीने टाच आणली आहे.
वरळीतील सीजे हाऊसमधील दुसऱ्या मजल्यावर आधीच ईडीने कारवाई केली होती. आज चौथ्या मजल्यावरील घरावर ही कारवाई करण्यात आली आहे. दुपारी ईडीचे अधिकारी येथे आले होते. त्यानंतर त्यांनी चौथा मजली सील केला.
वरळी येथे सीजे हाऊस नावाची मोठी इमारत आहे. या इमारतीच्या बांधकामाआधी त्या जागेवर एक छोटीशी इमारत होती. ही इमारत गँगस्टर इक्बाल मिर्ची याच्या ताब्यात होती. या कंपनीची पुनर्बांधणी प्रफुल्ल पटेल यांच्या कंपनीने केली होती.
त्या मोबदल्यात प्रफुल्ल पटेल यांनी इक्बाल मिर्ची आणि त्याच्या कुटुंबियांना काही जागा आणि मोठ्या प्रमाणात रोख रक्कम दिली असल्याची माहिती आहे.
या व्यवहारात गैरप्रकार झालाचा संशय ईडीला आहे. त्यामुळे प्रफुल्ल पटेलांवर मनी लॉन्ड्रिंगचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे
महाराष्ट्र विधानसभेच्या २०१९ च्या निवडणुकीनंतर पहिल्यांदा प्रफुल्ल पटेलांना ईडीने नोटीस पाठवली होती. त्यावेळी त्यांनी पहिल्यांना इक्बाल मिर्चीसोबत व्यवहार केल्याचे मान्य केले होते.



मुंबई : महाराष्ट्र राज्यांचे नुतन मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांची मुख्यमंत्री कार्यालय येथे लहुजी शक्ती सेनचे प्रदेश कार्यकारणी सदस्य बालाजी गायकवाड, मारूती क्षिरसागर, प्रविण क्षिरसागर यांनी भेट घेऊन सत्तास्थापनेबद्दल शुभेच्छा दिल्या तसेच मातंग समाजाच्या विविध प्रलंबित मागण्यांबाबत सकारात्मक चर्चा केली. यावेळी मुख्यमंत्री महोदयांनी लहुजी शक्ती सेनेच्या सामाजिक कार्यांचे कौतुक केले व मातंग समाजाचे प्रश्न सोडवण्याचे आश्वासन दिले.



# मेघ मल्हार व्याख्यानमालेत उपजिल्हाधिकारी अंजली धानोरकर यांचे व्याख्यान

आधुनिक केसरी न्यूज

**औरंगाबाद :** प्रगतीशील ज्येष्ठ नागरिक सेवाभावी संस्थेच्या वी वी चिपळूणकर सभागृहात मेघ मल्हार व्याख्यान मालेचे प्रथम पुष्प अंजली धानोरकर यांनी गुंफले. आपल्या भाषणात त्यांनी नकारात्मकता कशी कमी करून सकारात्मकता कशी वाढवावी यावर विचार मांडले.
आपल्या आजूबाजूला कितीही अशांतता, वादळ, गोंगाट, थैमान असला तरी आपण विचलित न होता शांत राहिले पाहिजे.
बाहेर कितीही वादळ असल तरी मन शांत ठेवणं, स्थिर ठेवणं आपल्याला शक्य झाले पाहिजे. दिवसभरात ६०,००० विचार आपल्या मनांत येत असतात. व त्यापैकी ८० % विचार निगेटिवच असतात. त्यामुळे जास्त ताकदीने सकारात्मक विचार मनात आले पाहिजेत. विचारावर नियंत्रण करणे जरी आपल्याला शक्य नसले तरी विचार बदलने आपल्याला शक्य असत. निगेटिव विचार काढून पोझीटिव्ह विचार मनात आणले पाहिजेत. आपल्या आयुष्यावर आपले, नियंत्रण नसते पण आपले आयुष्य आपण चांगले घडवू शकतो. आपल्या आयुष्यात आपण विचार करून काही निर्णय घेतो, पण त्याचा परिणाम कधी कधी नकारात्मक दिसतो. परिस्थिती कशीही असली तरी विचार कसे करायचे ते आपल्या हातात असत. नकारात्मकता कमी करण्यासाठी मंत्र, स्तोत्र पठण, ओंकार जप खूप उपयोगी पडतात. जेव्हा आपण ओंकार जप करतो, श्वासावर लक्ष केंद्रित करतो, एकाग्रता असते. त्यावेळी दुसरा कसलाही विचार मनात येत नाही. त्यामुळे कुठलेही संकटाला तोंड देण्याची क्षमता निर्माण होते. सकारात्मकता टिकवून ठेवली तर कोणत्याही संकटातून बाहेत पडण शक्य होत, असे त्या शेवटी म्हणाल्या.
प्रगतीशील ज्येष्ठ नागरिक संस्थेचे अध्यक्ष भरत कुलकर्णी, स्फूर्ती महिला मंडळाच्या अध्यक्ष मंजुषा कोरंगलीकर, रोटरी क्लब ऑफ औरंगाबाद मिडटाऊन च्या अध्यक्ष दिव्या मराठे उपस्थित होते. स्फूर्तीच्या सचिव शुभदा जोशी यांनी सूत्रसंचालन केले. मीरा पत्की यांनी आभार प्रदर्शन केले.



# मंदीचे संकट

आधुनिक केसरी

येत्या काळात मंदीचे संकट आणखी वाढत असल्याचे दिसत आहे असे 'वर्ल्ड इकॉनॉमिक आऊटलुक'च्या जुलैच्या अंकात आंतरराष्ट्रीय नाणेनिधी स्पष्टपणे म्हंटले आहे. या विधानाच्या काही आठवड्यांपूर्वी अमेरिकेची अर्थव्यवस्था १.६ टक्क्यांनी संकुचित झाल्याचंही दिसून आले आहे. एप्रिल-जूनच्या तिमाहीमध्ये जगातील सर्वात मोठी अर्थव्यवस्था असलेल्या अमेरिकेच्या अर्थव्यवस्थेत दीड टक्क्यांची घसरण अपेक्षित करत महागाईचा सामना करण्यासाठी अमेरिकेच्या फेडरल रिझर्व्हने व्याज दरात वाढ केली. अमेरिकेची अशी अवस्था झाली असतांना जगभरातील बदलती स्थिती लक्षात घेता मंदी हा विषय सध्या चर्चेचा ठरला आहे. याच मंदीच्या विषयावर सध्या सुरु असलेल्या संसदेच्या पावसाळी अधिवेशनात प्रश्नही विचारण्यात आले. साधारण दोन लागोपाठच्या तिमाहीत जर 'सकल राष्ट्रीय उत्पादन'मध्ये घट झाली तर सर्वसाधारणपणे अर्थव्यवस्थेत मंदी आली असा शब्द वापरला जातो, याला 'तांत्रिक मंदी' असेही म्हटले जाते. प्रसारमाध्यमांमध्ये हाच शब्द सर्रासपणे वापरला जातो. हीच व्याख्या गृहीत धरली तर भारतामध्ये २०२० ला मंदी आली होती. २०२० च्या एप्रिल ते जून आणि जुलै ते सप्टेंबर या कालावधीत देशाच्या जीडीपीमध्ये घसरण झाली होती. अर्थात बोली भाषेत या स्थितीला मंदी जरी म्हटले जात असले तरी अशा सरळधोपट पद्धतीने अशा अवस्थेला मंदी म्हणून ओळखली जात नाही. अमेरिकेच्या 'नॅशनल ब्युरो ऑफ इकोनॉमिक रिसर्च' या संस्थेच्या म्हणण्यानुसार सतत काही महिने अर्थव्यवस्थेची उलाढाल ही जर मंदावली तरच मंदी आली आहे असे म्हणता येईल. म्हणजे सलग दोन तिमाहीत जीडीपीमध्ये झालेल्या घसरणीचा नियम इथे लावता येणार नाही. 'नॅशनल ब्युरो ऑफ इकोनॉमिक रिसर्च'च्या म्हणण्यानुसार मंदीच्या संकल्पनेबाबत आणखी सुक्ष्म मुल्यांकन केले पाहिजे, मंदी आहे असे सांगण्याचा निश्चित असा नियम नाही. मंदी ठरवण्याबाबत 'नॅशनल ब्युरो ऑफ इकोनॉमिक रिसर्च' काही मुद्दे विचारत घेते. वैयक्तिक खर्च, घाऊक महागाई दर, किरकोळ विक्री, औद्योगिक उत्पादन या माहितीच्या आधार घेत मंदीबाबत ही संस्था भाष्य करते. गेल्या काही वर्षांमध्ये वैयक्तिक उत्पन्न वजा हस्तांतरण आणि बिगर-शेती वेतन रोजगार असे दोन मुद्देही ही संस्था विचारात घेत आहे. असे मुद्दे विचारत घेत आणि सलग दोन तिमाहींचा आढावा घेत मंदीबाबत भाष्य केले जाते. पण अशी काही उदाहरणे आहेत की ज्यामध्ये सलग दोन तिमाहींचा विचार न करता मंदी आहे असे म्हटले गेलेले आहे. एप्रिल-जूनच्या तिमाहीमध्ये अमेरिकेची अर्थव्यवस्था एकीकडे मंदावण्याची शक्यता वर्तवली जात असतांना भारतातही तांत्रिक मंदीला सामोरे जावे जाणार आहे. रिझर्व्ह बॅंक ऑफ इंडियाने २०२३ च्या आर्थिक वर्षात अर्थव्यवस्थेचा वेग हा ७.२ टक्के एवढा असेल असा अंदाज वर्तवला आहे. असे असले तरी रशिया-युक्रेन युद्धामुळे अर्थतज्ञ अर्थव्यवस्थेचा वेग आणखी मंदावेल असा अंदाज वर्तवत आहेत.

# भारतीय राज्यकर्त्यांनो सावधान !



प्रा. डॉ. विठ्ठल जायभाये
संपर्क क्र. 9158064068

आधुनिक केसरी

**"अति सर्वत्र वर्ज्यते" या सुभाषिताप्रमाणे अति झाले की; त्याची माती होत असते ! हे पुन्हा एकदा श्रीलंकेत सामान्य लोकांनी जगाला दाखवून दिले. आपल्या शेजारी देशात झालेल्या या जनक्रांतीवरून भारतीय राजकारणी लोकांनी वेळीच सावध होण्याची वेळ आली आहे ! आपल्या देशात धर्म आणि वरवरच्या बाबींचा आधार घेऊन जर धेय्य-धोरणे राबवली गेली तर आपलाही खडतर काळ सुरु होईल काय (?) असा प्रश्न तज्ञ, बुजुर्ग आणि जाणते लोक दबक्या आवाजात विचारू लागले आहेत.**

इतिहासाची पुनरावृत्ती होत असते ! भारतीय महाकाव्य रामायणात लंका दहन हा सर्वकाळ चिंतनाचा विषय ! आत्तापर्यंत हनुमान उड्डाण आणि लंका दहन याचे भरपूर मंथन झाले, परंतु ते लंका दहन होताना आपण कुणीच नव्हतो ! आज पुन्हा एकदा लंका दहन झाले आणि श्रीलंकेतील सामान्य माणसं म्हणजेच वानरसेना रावणाच्या अगदी शयनग्रहात जाऊन झोपून आली ! यावेळची वानरसेना ही श्रीरामाची नव्हती, तर ती श्रीलंकेतीलच होती हे विशेष ! अनेकांनी अनेक गोष्टी केल्या. काहींनी पंतप्रधानाच्या स्विमिंगपूलामध्ये मनसोक्त डुंबून मजा केली, तर काहींनी स्वयंपाकघरात जाऊन शाही पदार्थांचा मनसोक्त आस्वाद घेतला ! अगोदरच्या लंका दहनाच्या वेळी एकट्या हनुमानाने जाऊन लंका दहन केले होते, यावेळी मात्र तेथील लोकच हनुमान झाले आणि लंका धुतली आणि नंतर पेटवून द्यायला सुद्धा विसरले नाहीत. अगोदरचे लंका दहन का झाले? याचे उत्तर म्हणजे अधर्म आणि भ्रष्टाचार! वर्तमानात झालेले दुसरे लंका दहन त्याहून भयंकर आहे! श्रीलंका हा लोकशाही प्रजासत्ताक आणि एकात्मक देश आहे जे अर्ध-राष्ट्रपती प्रणालीद्वारे शासित आहे, ज्यामध्ये अध्यक्षीय आणि संसदीय प्रणालीचे मिश्रण आहे. भारताच्या स्वातंत्र्य लढयाप्रमाणेच श्रीलंकेच्या नागरिकांनी इंग्रज सरकारविरुद्ध लढा देऊन चारशे वर्षे ब्रिटीश अधिपत्त्याखाली असलेल्या श्रीलंकेला १९४८ साली स्वातंत्र्य मिळवून दिले. अनेक युवक, देशभक्तांनी श्रीलंका स्वातंत्र्यासाठी आपल्या प्राणांची आहुती दिली. आत्तापर्यंत पंधरा पंतप्रधानांनी श्रीलंका देश यशस्वीपणे चालवण्याचा प्रयत्न केला, परंतु लंका दहनाची खरी ठिणगी पडली ती म्हणजे 28 एप्रिल 2015 रोजी श्रीलंकेच्या संसदेने राज्यघटनेतील एकोणिसाव्या घटनादुरुस्तीला मंजूरी देतांना पंतप्रधानांना सरकारचे अधिकार असतील, तर राष्ट्रपती राज्याचे प्रमुख, मंत्रिमंडळाचे प्रमुख आणि कमांडर-इन-चीफ राहतील. सत्तेच्या विकेंद्रीकरन फार्मुल्यात पंतप्रधान आणि राष्ट्रपती यांना तेवढ्याच प्रमाणात जबाबदारीची विभागणी करण्यात आली. इसविसन २०१५ नंतर श्रीलंकेची परिस्थिती दिवसेंदिवस बिघडत गेली. तिथे सैन्यात महत्वपूर्ण पदावर असलेल्या आणि मुळात राजवंशात जन्मलेल्या राजपक्षे आणि विक्रमसिंघे कुटुंबियांच्या हाती सत्ता गेली. अगोदरच अर्थव्यवस्था मोडकळीस आलेली असतांना वंश आणि घराणेशाहीने श्रीलंका संसदेत शिरकाव केला आणि श्रीलंका पतनाला प्रारंभ झाला. राजपक्षे घराण्याने कधी पंतप्रधान तर कधी राष्ट्राध्यक्ष ही दोन महत्वपूर्ण पदे आपल्याकडे ठेवून मनसोक्त सत्ता उपभोगण्याचे काम चालू ठेवले. राजपक्षे आणि विक्रमसिंघे कुटुंब श्रीलंकेत जवळपास पंचवीस वर्षे निरंकुशपणे सत्तेत असताना त्यांना देश आणि देशहित या बाबी गौण झाल्या.



राजपक्षे आणि विक्रमसिंघे कुटुंबांनी लोकशाहीला बटिक करून ठेवले. कोणतीही निवडणूक असो की निर्णय, त्यांनी आपल्यापरीने ते संमत करून घेतले. विशिष्ट घराण्यांची निरंकुश सत्ता असल्याकारणाने त्या दोन कुटुंबांना कुणाचा विरोध झाला तरी काही फरक पडला नाही. "निरंकुश सत्ता पूर्णतः भ्रष्ट असते (ABSOLUTE POWER CORRUPTS ABSOLUTELY)" या लॉर्ड एक्टनच्या मताप्रमाणे श्रीलंकेतील लोकशाहीत घराणेशाही आणि राजेशाहीने उच्छाद मांडला. एकाधिकारशाही, गुंडगिरी, भ्रष्टाचार, पिळवणूक, हुकुमशाही इत्यादी देशविघातक बाबींनी श्रीलंका देश पुरता पोखरून निघाला. अनेक मोठ्या राजकीय लोकांचे खून झाले. संपूर्ण देशातील वातावरण गढूळ झाल्यामुळे आणि मोकाट यंत्रणांमुळे नक्षलवादी संघटनांनी तोंड काढले. तसेच २००९ नंतर झालेल्या नागरी युद्धामुळे श्रीलंका आर्थिक दृष्ट्या दुर्बल झाला, परिणामी आंतरराष्ट्रीय नाणेनिधीकडून हजारो कोटी डॉलर्सचे कर्ज उचलले गेले. देशातील पर्यटन व्यवसाय मोडकळीस आला. दुर्दैवाने २०१९ मध्ये राजधानी कोलोंबोतील तीन महत्वपूर्ण चर्च आणि हॉटेल्समध्ये बॉम्बस्फोट झाले आणि लगेच जगभर कोरोना महामारीने थैमान घातल्यामुळे पुन्हा एकदा उरलेसुरली श्रीलंकेची वाताहत झाली.

तसेच श्रीलंकेत रासायनिक खतांवर निर्बंध आणून शेंद्रीय शेती कायदा झाल्यामुळे सामान्य शेतकरी वर्गात असंतोषाची लाट पसरली. शेतीचे उत्पादन घटले. आर्थिक दिवाळखोरीमुळे संपूर्ण देशातील उद्योग-व्यवसाय मोडकळीस आले. सगळीकडे महागाई आणि बेरोजगारीने थैमान माजले. एकीकडे राजकर्ते आपल्या सोई-सुविधांमध्ये मश्गुल असताना सामान्य लोकांच्या जगण्या-मरण्याचे प्रश्न निर्माण झाले. लाखो बेकार तरुणांच्या हाताला काम नसल्यामुळे संपूर्ण श्रीलंका देशात प्रचंड अस्वस्थता निर्माण झाली. याचा परिपाक म्हणजे कुणाच्याही नेतृत्वाशिवाय सामान्य माणसांनी घराणेशाही-एकाधिकारशाही राजकारणी लोकांच्या विरोधात रणसिंग फुंकले. हजारो लोक रस्त्यावर आले. "ये पब्लिक है सब जानती है" प्रमाणे सर्व लोक सरळ पंतप्रधान आणि राष्ट्रपती यांच्या घरावर चालून गेले. प्रचंड उद्रेक झाला. जाळपोळ-दगडफेक-गोळीबार आणि भ्रष्ट राजकारणी लोकांची सत्ता उधळून लावली. मी मी म्हणणाऱ्या पंतप्रधानांना जीव मुठीत घेऊन पळून जावे लागले. याला म्हणतात जनक्रांती !

भारतात महागाई गगनाला भिडते आहे, दिवसेंदिवस रोजगाराच्या संधी आकुंचन पावत आहेत. कुठलीच सरकारी मेगा भरती होत नाही. खाजगीकरण-जागतिकीकरण-उदारीकरणाच्या नावाखाली शासकीय अस्थापना बासनात गुंडाळल्या जात आहेत. शिक्षण-आरोग्य प्रचंड महाग होत आहे. एकीकडे श्रीमंत लोकांची संपत्ती, तर दुसरीकडे गरीबी-बेरोजगारीचे प्रमाण वाढत आहे. आज आंतराष्ट्रीय स्तरावर जरी आपला भारत देश झळकत असला; तरी देशांतर्गत अनंत समस्या आवासून उभ्या आहेत हे दुर्लक्षून चालणार नाही ! देशातील सर्वच मुख्यमंत्री आणि पंतप्रधान यांनी यावर त्वरित प्रभावी उपाययोजना करणे क्रमप्राप्त झाले आहे. राजकारणी लोक दिवसाढवळ्या देश लुटत आहेत. श्रीमंत लोक आणखी श्रीमंत, तर गरीब आणखी गर्तेत जात आहेत. काहीतरी मापदंड ठरवून देशात आर्थिक समानतेसाठी एखादी राष्ट्रीय मोहीम राबवावी लागणार आहे. गोरगरिबांना उत्तम दर्जाचे शिक्षण आणि आरोग्य देशाने उपलब्ध करून देणे गरजेचे आहे. तेंव्हा, जर आपल्या देशात श्रीलंकेसारखी परिस्थिती उद्भवू द्यायची नसेल, तर तात्काळ रोजगाराच्या संधी उपलब्ध करून द्याव्या लागतील, गरीब-श्रीमंत दरी कमी करण्यासाठी "सिलिंग" सारख्या कडक कायद्याची गरज असून भ्रष्टाचाराला आळा घालण्यासाठी ठोस पावले उचलावी लागतील. असे झाल्यास खऱ्या अर्थाने आपल्या देशातील सामान्य लोक आनंदी राहतील. तसेच लोकांनी सुद्धा स्वतः कामाचे महत्व पटवून घ्यावे लागेल. लोकांनी स्वतः दारू, तंबाखू, गुटखा, आदि व्यसनांपासून दूर राहिल्यास कुटुंबासमोरील प्रश्न कमी होतील. असे झाल्यास आपल्या देशाची कीर्ती जगभर जाऊन "भारत देशाचा नागरिक" अशी वेगळी ओळख निर्माण होईल ! चला तर भारतीयांनो, आपण सर्वजन मिळून देशाला उत्तुंग यशोशिखरावर नेतांना आपली श्रीलंका होणार नाही याची दक्षता घेऊयात आणि भारत मातेच्या ऋणातून उत्तराई होण्याचा प्रयत्न करूयात ! जय हिंद ! जय भारत !

**(टीपः लेखक हे व्याख्याता, कवी, लेखक, प्रबोधनकार, प्राणायाम प्रशिक्षक आहेत)**

# महान पार्श्वगायक मुकेश




श्याम बसप्पा ठाणेदार
संपर्क क्र.: ९९२२५४६२९५

आधुनिक केसरी

**आज २२ जुलै, हिंदी चित्रपट सृष्टीतील महान पार्श्वगायक मुकेश यांची आज जयंती. आजच्याच दिवशी ९९ वर्षापूर्वी म्हणजे २२ जुलै १९२३ रोजी मुकेश यांचा जन्म झाला. मुकेश यांचे संपूर्ण नाव मुकेश चंद माथूर असे होते. दिल्लीतील दारियागंज आणि चांदणी चौकात त्यांचे बालपण गेले. त्यांच्या वडिलांचे नाव जोरावर चंद माथूर असे होते ते इंजिनिअर होते तर आई राणी या गृहिणी होत्या. मुकेश यांना बालपणापासून संगीताची आवड होती. त्याकाळातील प्रख्यात गायक कुंदनलाल सहगल यांचे ते प्रशंसक होते. त्यांनाही कुंदनलाल सहगल यांच्याप्रमाणे अभिनेता व गायक व्हायचे होते त्यासाठी त्यांनी लहान वयातच त्यांची संगीताचे प्राथमिक धडे गिरवले.**

त्याकाळातील गाजलेले अभिनेते मोतीलाल यांनी मुकेश यांना त्यांच्या दूरच्या बहिणीच्या लग्नात गाताना पाहिले. "मुकेश यांचा आवाज ऐकता क्षणीच ते त्यांच्या आवाजाच्या प्रेमात पडले. एक दिवस हा आवाज हिंदी चित्रपट सृष्टिचा आवाज बनेल असे ते त्यांच्या आई वडिलांना म्हणाले. त्यांनी मुकेश यांना मुंबईत आणले आणि गायक पंडित जगन्नाथ यांच्याकडून गायनाचे शास्त्रशुद्ध प्रशिक्षण घेण्यास सांगितले. त्यांनीही गायनाचे शास्त्रशुद्ध प्रशिक्षण घेतले. या दरम्यान त्यांना काही चित्रपटात अभिनयाच्या ऑफर्स आल्या. मुकेश यांचा राजबिंडा चेहरा आणि स्मितहास्य यामुळे त्यांना थेट नायकाच्या भूमिका मिळाल्या. १९४१ साली निर्दोष या चित्रपटात त्यांनी पहिल्यांदा अभिनय केला. त्यानंतर चार पाच चित्रपटात त्यांनी भूमिका केल्या मात्र त्यांनी अभिनय केलेले चित्रपट काही विशेष चालले नाही त्यामुळे नायक बनण्याचे आपले स्वप्न बाजूला ठेवून त्यांनी गायनावर लक्ष केंद्रित केले. गायक म्हणून मुकेश यांना पहिला ब्रेक मिळाला तो १९४५ साली आलेल्या पहिली नजर या चित्रपटात. या चित्रपटात त्यांनी गायलेले दिल जलता है तो जलने दो हे गीत खूप लोकप्रिय झाले. या गीतामुळे चित्रपट सृष्टित त्यांची ओळख निर्माण झाली. या गाण्यावर कुंदनलाल सहगल यांच्या शैलीचा प्रभाव होता. १९५८ साली आलेल्या यहुदी या चित्रपटातील ये मेरा दिवानापन है हे गाणे देखील खूप गाजले या गाण्याद्वारे त्यांनी स्वतःची वेगळी शैली निर्माण केली आणि कुंदनलाल सहगल यांच्या प्रभावातून ते बाहेर पडले. त्यानंतर हिंदी चित्रपट सृष्टित मुकेश युग सुरू झाले. त्यांनी अनुनासिक शैलीत गायलेले गाणे हिट होऊ लागले. मेला आणि अंदाज या चित्रपटात त्यांनी गायलेले सर्व गाणी लोकप्रिय झाले.



अंदाज हिट झाल्यानंतर मुकेश रणजित नावाच्या स्टुडिओत गायनाचा रियाज करीत होते तेंव्हा तिथे एक देखणा तरुण आला आणि म्हणाला किती भावनाप्रधान आहे तुझा आवाज. मला तुझा आवाज खूप आवडतो. तो तरुण होता राज कपूर. पुढे राज कपूर आणि मुकेश हे हिंदी चित्रपट सृष्टीतील यशाचे समीकरण बनले. या जोडीने अनेक हिट गाणी दिले. आग, आवरा, श्री ४२०, बरसात, परवरिश, अनाडी, संगम, मेरा नाम जोकर या आर के बॅनरच्या चित्रपटातील मुकेश यांनी गायलेली सर्व गाणी गाजली. राज कपूर यांचा आवाज अशीच मुकेश यांची ओळख निर्माण झाली. राज कपूर यांच्या सत्यम शिवम सुंदरम या चित्रपटातल्या गाण्याचे रेकॉर्डिंग करून ते अमेरिकेला गेले होते. डेट्रॉय मिशिगन मध्ये २७ ऑगस्ट १९७६ रोजी ते लवकर उठून अंघोळीसाठी गेले असता अचानक त्यांच्या छातीत कळ आली आणि त्यांची प्राणज्योत मावळली. त्यांच्या निधनानंत राज कपूर यांनी आज माझा आवाज कायमचा हरपला! अशी प्रतिक्रिया दिली. मुकेश यांनी तीन दशकांहून अधिक काळ आपल्या अनोख्या गायन शैलीने रसिकांवर मोहिनी घातली. मुकेश यांचा दर्दभरा आवाज रसिकांच्या मनावर कायमचा कोरला गेला आज इतक्या वर्षानीही त्यांचा दर्दभरा आवाज रसिकांना मोहित करतो. त्यांना अनेक पुरस्कार मिळाले. रजनिगंधा या चित्रपटासाठी त्यांना राष्ट्रीय पुरस्कार मिळाला तर चार वेळा फिल्मफेअर पुरस्कार मिळाला मात्र ते रसिकांच्या मनात त्यांचे जे स्थान आहे त्याला सर्व पुरस्काराहून श्रेष्ठ आहे मानत. त्यांच्यासारखा महान पार्श्वगायक पुन्हा होणार नाही. जयंतीदिनी मुकेश यांना भावपूर्ण आदरांजली!

हे पत्र संपादक, मालक, मुद्रक व प्रकाशक डॉ. प्रभू व्यंकटराव गोरे* यांनी सोलापूर तरुण भारत मीडिया लि., प्लॉट नं ए -32, औरंगाबाद इंडस्ट्रीयल को-ऑप., सोसायटी, स्टेशन रोड, औरंगाबाद 431 005 (महाराष्ट्र) येथे मुद्रित करून प्लॉट नं. 205, 13 वी योजना, जिजामाता कॉलनी, एन - 2, सिडको, जि. औरंगाबाद (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले. (* पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची आहे. या अंकात प्रसिद्ध झालेल्या प्रत्येक बातमी, लेख व जाहिरातींशी संपादक सहमत असतीलच असे नाही. सर्व वाद औरंगाबाद न्यायालयाच्या कक्षेत)
TITLE CODE -MAHMAR51117, ई-मेल : aadhunikkesari@gmail.com, संपर्क : +91 90757 16739

Printed at Solapur Tarun Bharat Media Ltd., Plot No. A-32, Aurangabad Industrial Co-op, Society, Station Road, Aurangabad 431005 (Maharashtra) Plot No. 205, 13th Plan, Jijamata Colony, N - 2, CIDCO, Dist. Aurangabad (Maharashtra) and published by editor, owner, printer, and publisher Dr. Prabhu Venkatrao Gore * (* According to the PRB Act, it is the responsibility of the editor. The editor does not necessarily agree with every news, article, and advertisement published in this issue. All disputes are within the purview of the Aurangabad court.)
TITLE CODE -MAHMAR51117, E-mail: aadhunikkesari@gmail.com, Contact : +91 90757 16739

# नीट परीक्षेत विद्यार्थिनींचे मानसिक खच्चीकरण



सुनील शिरपुरे, यवतमाळ
संपर्क क्र. 7057185479

आधुनिक केसरी

**केरळमध्ये नीट परीक्षेवेळी घडलेल्या प्रकारामुळे एक महत्त्वाचा मुद्दा समोर येतो की, ज्या विद्यार्थिनींचं यामुळे नुकसान झालं आहे, त्यांचं काय? एकतर घडलेल्या प्रकारामुळे त्यांना निट पेपर सोडवता आला नाही. म्हणून या परीक्षेच्या निकालावर त्याचा परिणाम होणार आहे. तर दुसरं म्हणजे मुलींच्या मानसिकतेवर जो परिणाम झाला आहे, त्याचं काय? त्या मेंटल ट्रामा मधून बाहेर यायला अनेकांना वेळ लागू शकतो. कदाचित पुढच्या वेळी परीक्षेला जाताना अनेकजणी घाबरू शकतात. महिलांसाठी ब्रा ही खूप खाजगी गोष्ट असते. ब्रा काढून घेणं अनेकांसाठी आत्मविश्वास काढून घेण्यासारखं झालं असेल. त्यात या सर्व विद्यार्थिनी १७ ते २३ वयोगटातील होत्या. म्हणजे कमी वयात अशा प्रकारच्या वागणुकीमुळे त्यांच्यात असुरक्षिततेची भावना बळावू शकते.**

नुकतीच १७ जुलैला देशभरात वैद्यकिय प्रवेशासाठीची नीट परीक्षा पार पडली आणि या परीक्षेदरम्यान घडलेल्या एका घटनेमुळे देशभरात सध्या एकच कल्लोळ सुरू झाला आहे. ही घटना केरळमध्ये घडली आहे. केरळमधील कोल्लम जिल्ह्यातील मार थोमा इन्स्टिट्यूट ऑफ इन्फॉर्मेशन टेक्नॉलॉजी या एका खाजगी शैक्षणिक संस्थेत नीट परीक्षा देण्यासाठी गेलेल्या विद्यार्थिनींना चक्क त्यांच्या ब्रा काढायला लावल्या गेलं.

ही बाब समोर आली तेव्हा परीक्षेसाठी गेलेल्या १७ वर्षाच्या एका मुलीच्या वडिलांनी याबाबतीत पोलिसांत तक्रार केली. गोपाकुमार सुरनाड असं तक्रार दाखल करणा-या व्यक्तीचं नाव आहे. सुरनाड यांची १७ वर्षाची मुलगी पहिल्यांदाच नीट परीक्षेला बसली होती. जेव्हा ते परीक्षा केंद्रावर पोहोचले, तेव्हा खूप आत्मविश्वासाने त्यांच्या मुलीने केंद्रात प्रवेश केला. त्यानंतर गोपाकुमार आणि त्यांची पत्नी जेवन करण्यासाठी म्हणून निघाले असता त्यांना 'माहिती तंत्रज्ञाना'चा कॉल आला आणि त्यांनी गेटवर त्यांना बोलावलं.

जेव्हा ते जोडपं गेटवर पोहोचले, तेव्हा त्यांची मुलगी गेटवर दिसली आणि ती रडवेली झाली होती. मात्र, तिने स्वतःला आवरत सांगितलं की, सेंटरमध्ये प्रवेश करताना जेव्हा तपासणी केली जात होती, तेव्हा सगळ्या विद्यार्थिनींना त्यांच्या ब्रा काढून टाकायला सांगितलं गेलं. म्हणून पेपर सोडवताना तिला अंगावर ओढण्यासाठी शाल हवी होती. गोपाकुमार यांच्या पत्नीने लगेच मुलीला शाल दिली आणि विद्यार्थिनी परत आत गेली. तिच्या पालकांना वाटलं की सर्व ठिक होईल.

पण जसा पेपर संपला आणि त्यांची मुलगी बाहेर आली, तशी ती आईच्या कुशीत शिरून रडायला लागली. तिने सांगितलं की ब्रा नसल्यामुळे तिला खूप अस्वस्थ वाटत हातं. एकतर तिची ब्रा काढून घेण्यात आली होती, त्यात परीक्षा केंद्रावर सुपरव्हिजनसाठी बहुतांश पुरुष होते. ३ तास ब्रा शिवाय बसणं, त्यातही आजूबाजूला परीक्षा देणारे मुलं देखिल होते. त्या सर्वांच्या नजरा मुलगी चुकवत होती. त्यामुळे विद्यार्थिनीला पेपरकडे लक्ष केंद्रित करता आलं नाही, असं विद्यार्थिनीने पालकांना सांगितलं.

विद्यार्थिनींनी ब्रा काढण्यास नकार दिला होता. नॅशनल टेस्टिंग एजन्सीने जो ड्रेसकोड निश्चित केला आहे त्यात याचा उल्लेख नव्हता, असं त्या म्हणाल्या. मात्र, त्यांच्या ब्राला मेटलचे हुक असल्याने मेटलची कोणतीही गोष्ट आत नेण्यास नियमानुसार मनाई आहे, असं त्यांना सांगितल्या गेलं. जर ब्रा काढणार नसाल तर परीक्षेला बसता येणार नाही, असं देखील म्हटल्या गेलं. शिवाय त्यांनी सांगितलं की, सेंटरच्या दोन रूमांमध्ये त्यांच्या ब्रा एकमेकांवर रचण्यात आल्या होत्या. म्हणजे कोविड-१९ प्रोटोकॉलचं उल्लंघन करण्यात आलं होतं.

ही घटना फक्त गोपाकुमार सुरनाड यांच्या मुलीसोबतच घडलेली नाही, तर इतर अनेक विद्यार्थिनी अशाच रडत, अस्वस्थ मनस्थितीत पेपर देऊन बाहेर आल्या होत्या. अनेक मुली चेहरा देखील वर करत नव्हत्या आणि काहीच बोलत नव्हत्या. मुलींची अवस्था बघून आणि झालेला प्रकार ऐकून संतापलेल्या गोपाकुमार यांनी कोट्टारक्कारा पोलीस उपअधिक्षक कार्यालयात जाऊन तक्रार दाखल केली. त्यांच्या तक्रारीनुसार पोलिसांनी कार्यवाही करत भारतीय दंड संहितेच्या कलम ३५४ आणि ५०९ अंतर्गत गुन्हा दाखल केला आहे. तसंच मानवी हक्क आयोगाने कोल्लम ग्रामीण एसपींना या प्रकरणाची चौकशी करून १५ दिवसाच्या आत अहवाल सादर करण्याच्या सूचना दिल्या आहेत.

एक गोष्ट लक्षात घेण्यासारखी म्हणजे नीट सारख्या देशपातळीवरील परीक्षेदरम्यान घडणारी अशी घटना खूप निंदनीय ठरते. म्हणून नक्की अशा परीक्षांसाठी ड्रेस कोड का देण्यात येतो? ड्रेस कोडचा नियम काय असतो? आपण शाळेत पेपर द्यायला जायचं, तेव्हा शिक्षक खूप तपासणी करून वर्गात पाठवायचे. अशात देशपातळीवरील परीक्षांसाठी खूप कडक नियम असतात. कुठल्याही प्रकारे चीटिंग सारखे गैरप्रकार होऊ नये म्हणून दक्षता घेतली जाते. म्हणून विशेष प्रकारचा ड्रेस कोड विद्यार्थ्यांना दिला जातो. हा पोशाख असा ठरवण्यात येतो, ज्याद्वारे कुठलीही चिठ्ठी, मायक्रोफोन लपवायला जागा राहणार नाही. नीट २०२२ साठी देण्यात आलेल्या ड्रेस कोडमध्ये विद्यार्थ्यांना लांब बाह्यांसह हलके कपडे घालण्याची परवानगी नाही. शूज घालता येणार नाही. त्याऐवजी कमी टाच असलेल्या चपला आणि सँडल घालता येतील, असं नमूद आहे.

कागद, पेन्सिल बॉक्स, प्लास्टिक पाउच, पेन, कॅल्क्युलेटर, स्केल, रायटिंग पॅड, पेन ड्राइव्ह, इरेझर्स आणि लॉग टेबल या सारख्या गोष्टी आत घेऊन जाता येत नाही. मोबाइल फोन, इअरफोन, पाकीट, गॉगल्स, घड्याळ, ब्रेसलेट, कॅमेरे अशा सगळ्यांवर बंदी आहे. कोणत्याही प्रकारच्या मेटल वस्तूंना आत प्रवेश दिला जात नाही. कारण याद्वारे मायक्रोफोन विद्यार्थी सोबत आणू शकतात, असं सांगण्यात येतं. पण मेटल हुक्स असलेले अंतर्वस्त्र, ब्रा घालता येतील की नाही, याबद्दल कुठलाच उल्लेख या ड्रेस कोडच्या नियमांमध्ये दिसत नाही.



जेईई मेन्स, जेईई ॲडव्हान्स्ड आणि सीयूईटी-यूजीसाठी ब-याच प्रमाणात सारखेच नियम आहेत. पण जेईई मेन्स आणि सीयूईटी साठी लॉंग स्लीव्ह्ज आणि शूजचं बंधन नाही. जेईई ॲडव्हान्स्डसाठी विद्यार्थ्यांना तावीज, अंगठी, ब्रेसलेट, इअररिंग्स, नोज पिन, नेकलेस, पेंडंट, बॅज, ब्रोच, मोठी बटणं असलेले कपडे अशा मेटल असलेल्या वस्तू घालण्यास मनाई करण्यात आली आहे. तर शूज ऐवजी चप्पल आणि सँडल घालण्यास सांगितलं जातं.

अशाप्रकारे मेटल हुक असल्याचं सांगून विद्यार्थिनींना ब्रा काढून टाकायला सांगितल्या गेलं. डेक्कन हेराल्ड या वृत्तसंस्थेला काही विद्यार्थिनींनी त्यांच्या प्रतिक्रिया दिल्या आहे. "आम्हाला ब्रा काढून वर्गात बसावं लागलं. वर्गात प्रवेश करताना खूप विचित्र वाटत होतं. तिथं मुलं सुद्धा होते. अनेक मुली आपल्या केसांच्या मदतीने छाती लपवण्याचा प्रयत्न करत होत्या. आमच्या ब्रा काढून त्या एका टेबलवर ठेवण्यात आल्या होत्या. परीक्षा संपल्यानंतर तिथे जाऊन प्रत्येकाला आपली ब्रा शोधून घ्यायची होती. ही खूप जास्त लाजिरवाणी गोष्ट होती. घरी सुद्धा आम्ही ब्रा घालून राहतो. बाहेर जाताना तर जास्त दक्षता घेतली जाते. अशाप्रकारे अचानक ब्रा काढायला लावणं आमच्यासाठी भयानक होतं. आम्ही अगदी काहीच घातलं नाही असं वाटत होतं. त्यामुळे पूर्णवेळ लक्ष या गोष्टीकडे होतं की, कुणी बघत तर नाही ना. या विचाराने खूप भीती वाटत होती."

या प्रकरणावरून मार थॉमस इन्स्टिट्यूट ऑफ इन्फार्मेशन ॲन्ड टेक्नॉलॉजी या परीक्षा केंद्राच्या वतीने स्पष्टीकरण देण्यात आलं आहे. 'संस्थेचा यात कुठलाही सहभाग नाही. एनटीएने ज्या एजन्सीला विद्यार्थ्यांची झडती घेण्याचं काम दिलं होतं, त्या एजन्सीचे कर्मचारी जबाबदार आहेत', असं केंद्राच्या प्रवत्यांनी सांगितलं आहे. तर एनटीएने देखील निवेदन जारी केलं आहे. त्यात म्हटलं आहे की, त्यांनी परीक्षा केंद्राचे अधीक्षक, स्वतंत्र निरीक्षक तसंच नीटचे कोल्लम जिल्ह्यातील शहर समन्वयक यांच्याकडून या प्रकाराबद्दल माहिती मागवली आहे. त्यांच्याकडे परीक्षेच्या वेळी किंवा त्यानंतर लगेचच कोणतीही तक्रार दिल्या गेली नाही, असं म्हटलं आहे. तर एनटीएला देखील या संदर्भात कोणताही ईमेल किंवा तक्रार प्राप्त झालेली नाही, असं सांगण्यात आलं आहे.

केरळच्या उच्च शिक्षणमंत्री आर बिंदू यांनी "एजन्सी आणि त्यांच्या कर्मचा-यांकडून गंभीर चूक झाली आहे. मुलींच्या मूलभूत मानवी हक्कांचा विचार न करता त्यांच्याविषयी असा दृष्टिकोन बाळगण्यात आला आहे, हे अत्यंत निंदनीय आहे." असं म्हणत केंद्रीय शिक्षणमंत्री धर्मेंद्र प्रधान यांना एक पत्र लिहून विद्यार्थिनींना त्यांच्या ब्रा काढण्यास भाग पाडणा-या एजन्सीच्या विरोधात कार्यवाही करण्याची जोरदार मागणी केली आहे.

तसं बघितलं तर केरळमध्ये अशा प्रकारची घटना काही पहिल्यांदाच घडलेली नाही. मे २०१७ मध्ये म्हणजे ५ वर्षापूर्वी केरळच्या कन्नूरमध्ये एक विद्यार्थिनी सकाळी ८ वाजता परीक्षा केंद्रावर पोहोचली. तिने स्लीव्हलेस टॉप आणि काळ्या रंगाची ट्राऊजर घातली होती. तेव्हा डार्क कलर चालत नाही म्हणत तिला आत प्रवेश दिला नाही. रविवार असल्यामुळे सगळे दुकान बंद होते. वेगळ्या रंगाची पॅन्ट शोधण्यासाठी तिच्या आईला जवळपास २ किलोमीटर पायपीट करावी लागली. शेवटी पॅन्ट चेंज केल्यानंतर ती आत गेली. मात्र त्यावेळी मेटल डिटेक्टर वाजलं. तिच्या ब्राला मेटल हुक होतं हे समजल्यावर तिला ती सुद्धा काढायला लावली. त्या विद्यार्थिनीने वर्गाच्या एका कोप-यात जाऊन ब्रा काढली आणि गेटवर उभ्या असलेल्या आईकडे दिली. तिच्या आईच्या चेह-यावरील भाव बघून विद्यार्थिनी अजूनच निराश झाली होती. त्यावेळी चार शिक्षकांना सस्पेंड करण्यात आलं होतं.

२०१८ साली देखील केरळमध्येच पल्लकड जिल्ह्यात एका मुलीला परीक्षा केंद्रावर ब्रा काढण्यास सांगण्यात आलं. पेपर लिहिताना सुपरवायजर सातत्याने तिच्याकडे पाहत होता. म्हणून तिचं लक्ष लागलं नाही, असं सांगण्यात आलं होतं. म्हणजेच अशाच प्रकारची ती तिसरी घटना केरळमध्ये घडल्याचं दिसत आहे. गेल्या दोन वेळा ठोस कार्यवाही झाली असं दिसत नाही. मात्र, यावेळी कार्यवाही केली जाईल, अशी अपेक्षा व्यक्त केल्या जात आहे. पोलिसांनी त्या परीक्षा एजन्सीच्या लोकांचा तपास देखील सुरू केला आहे.

मात्र, यातून एक महत्त्वाचा मुद्दा राहतो की, ज्या विद्यार्थिनींचं यामुळे नुकसान झालं आहे, त्यांचं काय? एकतर घडलेल्या प्रकारामुळे त्यांना निट पेपर सोडवता आला नाही. म्हणून या परीक्षेच्या निकालावर त्याचा परिणाम होणार आहे. तर दुसरं म्हणजे मुलींच्या मानसिकतेवर जो परिणाम झाला आहे, त्याचं काय? त्या मेंटल ट्रामा मधून बाहेर यायला अनेकांना वेळ लागू शकतो. कदाचित पुढच्या वेळी परीक्षेला जाताना अनेकजणी घाबरू शकतात. महिलांसाठी ब्रा ही खूप खाजगी गोष्ट असते. ब्रा काढून घेणं अनेकांसाठी आत्मविश्वास काढून घेण्यासारखं झालं असेल. त्यात या सर्व विद्यार्थिनी १७ ते २३ वयोगटातील होत्या. म्हणजे कमी वयात अशा प्रकारच्या वागणुकीमुळे त्यांच्यात असुरक्षिततेची भावना बळावू शकते.

केरळमधील या घटनेने मुलींचं मानसिक खच्चीकरण केलं आहे. एक प्रकारे त्यांचा छळ करण्याचाच हा प्रकार आहे, म्हणून यासंदर्भात कठोर पाऊल उचललं जावं अशी देशभरातून मागणी केली जात आहे. तेव्हा हे प्रकरण आता कोणतं वळण घेईल? हे बघणं गरजेचं आहे.

# वॉर्ड पद्धती अमलात आणण्याची गरज



रमेश लांजेवार, नागपूर
संपर्क क्र. 9921690779

आधुनिक केसरी

**वार्डपध्दतीमध्ये वन बाय वन (एकास-एक) लढत होते यामुळे सच्चा व निष्ठावंत व्यक्ती नगरसेवक बनतो. यावरून स्पष्ट होते की प्रभाग रचना फक्त श्रीमंत उमेदवारांपुरतीच सीमित आहे. त्यामुळे सरकारने प्रभागरचना संपूर्णपणे संपुष्टात आणून एक वार्ड पध्दती लागू करून अमलात आणावी. यामुळे एक वार्ड एक नगरसेवक तयार होईल व वार्डातील प्रत्येक व्यक्तीला आपल्या समस्या मांडने सोईस्कर होईल आणि नगरची सेवा करणारा सच्चा नगरसेवक उदयास येईल. नगराची सेवा करण्यासाठी फक्त नगरसेवकांची आवश्यकता असते. जेनेकरून आपल्या नगराची सेवा करता यावी. परंतु गेल्या काही वर्षांपासून प्रभागरचना अस्तित्वात आल्याने संपूर्ण क्षेत्रात वार्डाचा विकास खुंटल्याचे दिसून येते.**

पूर्वी प्रभाग रचनेत चार वार्डाचा एक प्रभाग होता. यानंतर आघाडी सरकारने चारच्या ऐवजी तीन वार्डाचा प्रभाग केला. आता भाजप-शिंदे सरकार प्रभागरचना बदलवीण्याची तयारी करीत आहे.परंतु प्रभाग पध्दतीमध्ये अनेक अडचणी निर्माण होतात व यांचे प्रायचित्य वार्डातील नागरिकांना भोगावे लागते आणि प्रभाग पध्दतीमुळे तळागाळातील सामाजिक कार्यकर्त्यांच्या कार्याची राखरांगोळी होवून त्यांच्या कार्यावर पाणी फेरल्या जाते. कारण आतापर्यंत झालेल्या प्रभाग पध्दतीच्या निवडणूकीत फक्त राजकीय पक्षांचाच बोलबाला असल्याचे दिसून आले. कारण राजकीय पक्षांजवळ पैसा, कॅम्पेनिंगची सुविधा, प्रचार माध्यमाचा मोठ्या प्रमाणात वापर यामुळे अपक्ष उमेदवार यांच्यापुढे टिकाव धरूच शकत नाही व सर्वसाधारण उमेदवारांची हार मोठ्या प्रमाणात होताना दिसून येते. यामुळे सामाजिक कार्यकर्ते व सर्वसाधारण व्यक्तीच्या सामाजिक कार्याचे महत्त्व शुन्य होते व यांना नगरसेवक बनण्यापासून वंचित रहावे लागत आहे. वार्डपध्दतीमध्ये वन बाय वन (एकास-एक) लढत होते यामुळे सच्चा व निष्ठावंत व्यक्ती नगरसेवक बनतो. यावरून स्पष्ट होते की प्रभाग रचना फक्त श्रीमंत उमेदवारांपुरतीच सीमित आहे. त्यामुळे सरकारने प्रभागरचना संपूर्णपणे संपुष्टात आणून एक वार्ड पध्दती लागू करून अमलात आणावी. यामुळे एक वार्ड एक नगरसेवक तयार होईल व वार्डातील प्रत्येक व्यक्तीला आपल्या समस्या मांडने सोईस्कर होईल आणि नगरची सेवा करणारा सच्चा नगरसेवक उदयास येईल. नगरची सेवा करण्यासाठी फक्त नगरसेवकांची आवश्यकता असते. जेनेकरून आपल्या नगराची सेवा करता यावी.परंतु गेल्या काही वर्षांपासून प्रभागरचना अस्तित्वात आल्याने संपूर्ण क्षेत्रात वार्डाचा विकास खुंटल्याचे दिसून येते.कारण एका प्रभागात तीन किंवा चार नगरसेवक निवडून येतात.अशा परिस्थितीत एकाच भागातुन चारही नगरसेवक निवडून आल्यास इतर क्षेत्राकडे नगरसेवकांचा काम करण्याचा दृष्टीकोन बदलतो व वार्डातील लोकांच्या अपेक्षांचा भंग होतात.ही बाब सर्वांनाच चांगल्याप्रकारे अवगत आहे.प्रभागरचना म्हणजे मिनी विधानसभा. नगरची सेवा करण्यासाठी मिनी विधानसभेची गरज नसुन एक वार्ड एक नगरसेवक पध्दतीची नितांत गरज आहे.कारण प्रभाग पध्दतीने अनेक वार्डांचा विकास रखडल्याचे दिसून येते.कारण रोडची समस्या, पाण्याची समस्या किंवा अन्य समस्या प्रभाग पध्दतीमध्ये नगरसेवक नागरिकांच्या समस्या ऐकायला तयारच नसतात.त्याचप्रमाणे प्रभागाची निवडणूक ही सर्वसाधारण नागरिकांच्या दृष्टीकोनातून घोर अन्याय आहे. कारण प्रभाग पध्दतीच्या निवडणूकीत एक उमेदवार कमीत कमी 10 ते 20 लाख रूपये खर्च करतो तेव्हा तो लढतींमध्ये येतो. म्हणजे सध्याच्या परिस्थितीत असे झाले आहे की नगरसेवक बणन्याकरीता लखपती असने अती आवश्यक असल्याचे दिसून येते.त्यामुळे तळागाळातील सामाजिक कार्यकर्ता, समाजसेवक हा नगरसेवक बनण्यापासुन दुरावत असल्याचे दिसून येते. त्यामुळे सर्वसामान्यांमध्ये प्रश्न निर्माण होतो की सर्वसामान्यांनी नगरसेवक बनुच नये काय?आज संपूर्ण महानगरपालिकांच्या निवडणुका सिंगल वार्ड पध्दतीनुसार घेतल्या तर खरे समाजसेवक व खरे नगरसेवक अवश्य निवडुण आल्याचे आपल्याला दिसुन येईल.महानगरपालीका निवडणुकांमध्ये पक्षांना महत्त्व कमी असते व्यक्तीला महत्त्व जास्त असते.त्यामुळे सिंगल वार्ड पध्दतीने खरे व्यक्ती प्रदर्शन दिसून येईल.यामुळे वार्डाचा विकास भरभराटीला येईल.सरकाने पुन्हा प्रभाग पध्दती अमलात आणली तर सर्वसामान्य कार्यकर्त्यांचा नामशेष होईल.यात फक्त आपल्याला राजकीय पक्षांचाच बोलबाला दिसून येईल.त्यामुळे सरकारला आग्रह करतो की प्रभागरचनेचा पुनरविचार करतांना एक नगरसेवक एक वार्ड या पध्दतीने बदल करावा.कारण प्रभाग पध्दतीमध्ये फक्त भाजप, कॉंग्रेस,राष्ट्रवादी कॉंग्रेस, शिवसेना यांनाच लाभ होणार आहे.अशा परिस्थितीत अपक्ष उमेदवारांची गळचेपी होणार नाही याचा विचार नवनिर्वाचित सरकारने घेतला पाहिजे.भाजप-शिंदे सरकार जनतेच्या हिताची आहे यांचे मी स्वागत करतो.परंतु प्रभाग रचनेचा पुणरविचार करतांना एक वार्ड एक नगरसेवक या पध्दतीचा सुध्दा विचार व्हायला हवा. कारण सध्याच्या परिस्थितीत प्रभाग पध्दती शहराच्या विकासाच्या दृष्टीने नुकसान दायक आहे.प्रभाग पध्दतीमध्ये निवडून आलेले नगरसेवक मुळातच कामाकडे दुर्लक्ष करतात.यामुळे आपल्याला असंतोषाचे वातावरण निर्माण झाल्याचे दिसून येते.नगराध्यक्ष आणि सरपंच यांची निवड थेट जनताच करणार या निर्णयाचे मी स्वागत करतो.यालाच अनुसरून एक वार्ड एक नगरसेवक यालाही सरकारने प्रथम प्राधान्य देवून ताबडतोब अंमलात आणले पाहिजे.यामुळे तळागाळातील लोकांना योग्य न्याय मिळण्यास मोठी मदत होईल.

# सकारात्मक पालकत्व

आधुनिक केसरी

**मुलं जन्माला घातल म्हणजे आपण त्याचे पालक झालो हे म्हणने वरकरणी सोपे वाटत असले तरी, पालकत्व निभावणे तितकेच कठीण असते. पालकत्व म्हणजे आवडत्या शाळेतील अवघड अभ्यासक्रम, जो कधी ऐकीव अनुभवातून तर कधी स्वानुभवातून शिकत रहावा लागतो. त्यात हरुन किंवा माघार घेवून चालतच नाहि. पूर्वी एकत्र कुटुंब पद्धतीत मुलांना आई वडीलांसोबतच आजी आजोबा, काका काकू, आत्या, मोठी भावंड, कधी पणजी आजी असे पालक घरातच लाभत. त्यामुळे वरचेवर अनेक गोष्टी मुलं घरातच सहज शिकत असे. त्यांच्या प्रत्येक समस्येसाठी आई वडिलच लक्ष द्यायला हवे असे याची गरज भासत नसे. घरातील इतरांचे अनुभव, सल्ले, मदत मुलं वाढविताना कामी येतं. त्यामुळे मुलांचे पालकत्व निभावणे आई-बाबांना काहीसे सुकर होतं असणार.**

मेसेज नोटिफिकेशन टोन वाजला तसा वसूधाने फोनकडे बघितले. तो टोन तिने तिच्या मुलीसाठी सेट केलेला असल्याने तिने पटकन मेसेज बघितला, "आई मला सगळेच अव्हॉइड करताय असे मला वाटतेय". वसूधाने मुलीला म्हणजे सईला कॉल केला. दहाविच्या कोचिंग क्लासला गेलेल्या आपल्या कन्येचा मेसेज बघून वसुधा जरा घाबरलीच होती. तिने सईला फोन करुन शांत केले व तडक तिचा क्लास गाठला. आईला बघून सई हमसून रडू लागली. कारण अगदी किरकोळ होते. रोज ज्या मैत्रीणीसोबत सई क्लासला बसत होती, ती आज दुसऱ्याच मुलीशेजारी बसली व इतर मुलींसोबत एकदम जावून ॲडजस्ट होणं त्या क्षणी सईला न जमल्याने ती गोंधळून गेली होती. वसूधाने तिला समजावून शांत केले. काही काळानंतर सईसुद्धा इतर मुलींमधे मिसळली. परंतु तो एक क्षण महत्त्वाचा होता, जेव्हा सईला तिच्या पालकांच्या आधाराची गरज होती. प्रसंग म्हटल तर खूप साधा व म्हटल तर तितकाच कठिणही होता. अशा अनेक लहान मोठ्या प्रसंगांना पालकांना सामोरे जावेच लागते. अशा अनेक प्रसंगी शांतपणे मुलांना समजून घेणं खूप गरजेच असत. मुलं लहान असो की मोठे, मुलगा असो की मुलगी, पालक म्हणून मुलं वाढविताना पालकही नव्याने घडत असतात, मोठे होत असतात. प्रत्येक प्रसंग पालकांना पालकत्वाचा नवा धडा शिकवत असतो.

मुलं जन्माला घातल म्हणजे आपण त्याचे पालक झालो हे म्हणने वरकरणी सोपे वाटत असले तरी, पालकत्व निभावणे तितकेच कठीण असते. पालकत्व म्हणजे आवडत्या शाळेतील अवघड अभ्यासक्रम, जो कधी ऐकीव अनुभवातून तर कधी स्वानुभवातून शिकत रहावा लागतो. त्यात हरुन किंवा माघार घेवून चालतच नाहि. पूर्वी एकत्र कुटुंब पद्धतीत मुलांना आई वडीलांसोबतच आजी आजोबा, काका काकू, आत्या, मोठी भावंड, कधी पणजी आजी असे पालक घरातच लाभत. त्यामुळे वरचेवर अनेक गोष्टी मुलं घरातच सहज शिकत असे. त्यांच्या प्रत्येक समस्येसाठी आई वडिलच लक्ष द्यायला हवे असे याची गरज भासत नसे. घरातील इतरांचे अनुभव, सल्ले, मदत मुलं वाढविताना कामी येतं. त्यामुळे मुलांचे पालकत्व निभावणे आई-बाबांना काहीसे सुकर होतं असणार.

सध्या नोकरी, व्यवसाय, शिक्षण, शहरीकरणाची ओढ, कौटुंबिक कलह अशा अनेक कारणांनी कुटुंब छोट्या घटकात



विभागली गेलीत. त्यामुळे च आई-बाबा किंवा एकल पालकत्व स्वीकारलेल्यांना मुलांचे पालक म्हणून सर्वच आघाडीवर तत्पर असावे लागते. मुलांचे पालण पोषण, त्यांच्या आवडी-निवडी, छंद, राग, मुड्स, आभ्यास, चांगल्या वाईट सवयी अशा सर्वच गोष्टींकडे लक्ष पुरविताना पालकत्वाची खरी कसोटी लागते, पालक दोन्ही नोकरी करणारे असले म्हणजे मुलांना पुरेसा वेळ देवू न शकणे ही एक गंभीर बाब बनत आहे. मुलांना फक्त सर्व सुख सुविधा उपलब्ध करून देऊन कर्तव्य संपत नाही. मुलं हे मशीन नाही. त्यामुळे त्यांच्या खर्या समस्या या वेगवेगळ्या असतात, त्या समजून घेवून त्यावर उपाय शोधण हे खरे कर्तव्य आहे. आपल्या मुलांची इतरांशी तुलना न करणे, दिवसभर घरात एकट्या रहाणार्या मुलांचा स्क्रिन टाईम कमी करणे, मुलांना खंबीर व प्रामाणिक बनवणे, त्यांच्या आवडी निवडींना योग्य दिशा देवून सपोर्ट करणे, अशी हि यादी खूप मोठी होणारी आहे.

मुलांना फक्त हे करु नका, तसे वागू नका हे सांगून भागणार नाही,काय करायला हवे याचा पर्याय सुद्धा पालकांनी उपलब्ध करुन द्यायला हवा. जसे की, मोबाईल वर किंवा टिंव्ही समोर फार वेळ घालवू नकोस हे मुलांना सांगताना त्यांना पुस्तके, बौद्धिक खेळ किंवा मैदानी खेळांचा पर्याय उपलब्ध करुन द्यावा. प्रसंगी पालकांनी स्वतः आपल्या मुलांचे मित्र होऊन त्यांना योग्य गोष्टीत रमण्यास मदत करायला हवी. योग्य वेळी योग्य पर्याय मुलांना उपलब्ध करुन दिला गेला तर त्यांच्या आयुष्याला योग्य दिशा मिळू शकते. म्हणून च कधी कौतुक तर कधी कडक शब्दात समज देणे यातील समतोल साधला गेला पाहिजे.

मनिषा चौधरी
नाशिक, मो. 9359960429

मुलांचे पालकत्व निभावताना प्रत्येक गोष्टीत मुलांना सल्ले देवून त्यांना वैचारिक पंगू ही बनवू नये. मुलं आत्मनिर्भर व्हावीत, स्वतः चे निर्णय त्यांना विचारपूर्वक घेता यावेत, शिवाय कुठल्याही कठीण प्रसंगी खचून न जाता खंबीरपणे सामोरं जाता यावं यासाठी त्यांचे सकारात्मक पालकत्व निभावणही जमायला हवेच. यासाठी साध्या सोप्या गोष्टी आवर्जून करणं गरजेच आहे.

1.अवगुणांना तिलांजली- मुलं हे आई वडिलांचे अनुकरण करतात.म्हणून च राग, भांडण, अविचार यांसारख्या अवगुणांना तिलांजली देवून पालकांनी मुलांसमोर शांतपणे वागायला बोलायला हवे. शांतपणे निर्णय घेणे, आपल्या चुका कबूल करुन त्या वेळीच सुधारणे, चांगल्या सवयींचा अंगिकार करणे अशा गोष्टींना प्राधान्य द्यावे.

2.माफ करणे शिकावे - मुलं लहान असो की मोठे , चुका या होतातच. सतत त्यांच्यावर डाफरणे,चुका दाखवणे असे करुन मुलांच्या भावना दुखावल्या जातात.ते हताश होऊ शकतात, किंवा चिडचिडे बनतात.म्हणूनच मुलांना प्रेमाने समजावून सांगण्यावर भर द्यावा.त्यांच्या चुकांची जाणीव सतत करुन देणे टाळावे. तुलना, हेटाळणी टाळावी.

3 संवाद- दिवसभर कितीही कामाचा व्याप असला तरी पालकांनी मुलांशी रोज संवाद साधायला हवा. मुलांचे म्हणणे शांतपणे ऐकून घ्यावे. पालक असलो तरी आपल्या मुलांचे चांगले मित्र मैत्रीण होण्याचा प्रयत्न करावा. जेणेकरून मुले मोकळेपणानं बोलतील, व योग्य वेळी पालक बनून त्यांना मदतही करता येईल.

4. तंत्रज्ञान - मोबाईल तंत्रज्ञानाचा वापर ही आधुनिक काळातील महत्त्वाची गरज असली तरी मुलांना त्यापासून दूर ठेवणही योग्य नाही , आणी अतिआहारी जावू देणं ही चुकीच आहे. आपले मुलं तंत्रज्ञानाचा कसा व किती वापर करते यावर काळजीपूर्वक लक्ष द्यावे, फसव्या साईट्, गेम्स, अँप्स,चुकीच्या लिंक यांची स्वतः माहिती ठेवावी म्हणजे पुढील नुकसान टाळणे शक्य होईल.

फक्त सल्ला देणाऱ्या व नावे ठेवणार्या पालकांपासून मुलं दुरावत जाते. म्हणून च पालक म्हणून स्वतः ला सकारात्मकतेने घडविणे ही सुद्धा काळाची गरज आहे. पालकत्व निभावताना सकारात्मकतेने पालण पोषण केलेल्या मुलांमध्ये अनेक कौशल्यांचा विकास होऊ शकतो, उत्तम नागरिक घडू शकतात.

# भेसळखोरांचा अक्षम्य स्वैराचार!

आधुनिक केसरी

**सर्वाधिक पेट्रोल पंप हे राजकीय पुढाऱ्यांच्या, बड्या अधिकाऱ्यांच्या, धनदांडग्यांच्या मालकीचे आहेत. काही सुरक्षितता म्हणून ते नातलगांच्या वतीने घेऊन ठेवले आहेत. मालकांसाठी हा व्यवसाय सोन्याची खाण ठरला असला तरी सामान्य ग्राहकांसाठी तो शोषणाचे, लुटीचे केंद्र ठरत आहे. आता ग्राहकांनीच आठवड्यातून एकदा तरी इंधनाचे नमुने सक्तीने तपासण्याची मागणी केली पाहिजे. ते विश्वासार्ह प्रयोगशाळेतून तपासून घेतले पाहिजेत. भेसळ आढळल्यास संबंधित पेट्रोल पंपाची मान्यता रद्द करायला हवी. मशिन प्रमाणित आहे, की नाही याचीही खात्री करायला हवी.असे कठोर उपाय योजले तरच सामान्य ग्राहकांची लूट थांबेल.**

आपण दैनंदिन लोक व्यवहार सुरळीत पार पडावा यासाठी वेगवेगळ्या व्यवस्था स्वीकारल्या आहेत; पण सामाजिक व्यवस्था मात्र अजूनही कळत-नकळतपणे कॉमन मॅन, सामान्य माणूस म्हणून आपलं शोषण करते.या शोषणाकडे धकाधकीच्या, यांत्रिक जीवनात अडकलेल्या लोकांना जागृत होऊन बघायला वेळ नाही.आज माणसाचं जीवन खूपच धावपळीचं झालंय त्यामुळे स्वतःच आपलं शोषण करून घेतोय

लोकशाही राज्य व्यवस्थेची कायदेमंडळ, मंत्रिमंडळ आणि न्यायालय अशी तीन अंगे व विभाग आहेत. त्यातले कायदेमंडळ हे कायदा करते. मंत्रिमंडळ कायद्यांची अंमलबजावणी करते. न्यायमंडळ कायदा बरोबर की चूक यावर नियंत्रण ठेवते. असे असूनही लोक बचावाच्या वाटा-पळवाटा शोधून आपला स्वार्थ साधून घेतात.या तीन डोळस व्यवस्था असूनही अनेक मंत्री भ्रष्टाचार-गैरव्यवहारात अडकतात. न्यायप्रविष्ट प्रकरणाला विलंब लागतो. त्यामुळे न्याय मागणाराच त्रस्त होतो.

सामाजिक-व्यावहारिक व्यवस्थेत मात्र आपल्या लुटीला सकाळपासून प्रारंभ होतो. ती सायंकाळपर्यंत सुरूच असते. सकाळी दूध देणारा माणूस शुद्ध, पौष्टिक दूध म्हणून पाणी टाकलेले दूध देऊन जातो. नंतर दिवसभर सामान्य, गरजू माणूस वेगवेगळ्या माध्यमातून लुटला जातो. किराणा दुकानदार, कापड विकणारा, मालक, ठेकेदार, मिठाई विक्रेता, सरकारी अधिकारी, पोलिस, तलाठी, पुरवठा अधिकारी हे सर्व लुटारू आपल्याकडे आलेल्या गरजवंताला दिवसभर लुटत असतात.त्यामुळे सामान्य माणसाचा अवस्था **'किती आहेत लुटारू । कशी मोजदाद करू ।। सूर्यादय ते सूर्यास्त आहे लुटमार सुरू ।'** अशी दयनीय होते. व्यवस्थेच्या या जात्यातून कुणीच सही-सलामत सुटले नाही. कुणी भरडला जातो. कुणी चक्क बारीक दळला जातो! कुणी सुरक्षित म्हणवणारा, चार चाकी वाहनातून फिरणारा भाग्यवान प्राणी पोलिसांच्या तावडीत सापडून चिरडला जातो.



वाहनांना इंधन-पुरवठा करणारी व्यवस्था आपण पेट्रोल पंपांच्या माध्यमातून स्वीकारली आहे; पण अलीकडे ही व्यवस्थाही भेसळखोरांनी पोखरून काढली आहे. भेसळीचे इंधन वितरित करणे, चोरी करून कमी इंधन पुरविणे हा प्रकार बिनदिक्कत सुरू आहे. त्यामुळे बहुतांश पेट्रोल पंप हे ग्राहकांची दिवसाढवळ्या लूट करणारे केंद्र बनले आहेत. इंडियन ऑईल, भारत पेट्रोलियम, हिंदुस्थान पेट्रोलिअम आणि आयबीपी चार कंपन्यांचे पेट्रोल पंप देशभर पसरलेले आहेत. चारही कंपन्यांनी पेट्रोल पंपांच्या देखरेखीसाठी तथा तपासणीसाठी अधिकारी नेमलेले आहेत; पण तो स्टाफ नेमका कुणाची तपासणी करतो हेच ग्राहकांना कळत नाही.स्टाफने चौकशी करून कुठल्यातरी पंपाविरुद्ध भेसळीच्या संदर्भात तक्रार केली, असे घडत नाही.घडलेच तर थातूर-मातूर चौकशीचे नाटक केले जाते. दोषी पंप चालकाला निर्दोष म्हणून शिक्का मारला जातो.

काही ठिकाणी तेल कंपन्यांचे स्वतःचे पेट्रोल पंप आहेत.तिथे शुद्ध पेट्रोलच मिळेल, अशी ग्वाही दिली जाते; पण तिथेही भेसळ सुरूच असल्याचे सिद्ध झालेच. काही दिवसांपूर्वी बरेली येथे कंपनीच्या पेट्रोल पंपावर भेसळ पकडली गेली.पण तपासणी करणाऱ्या अधिकाऱ्यांनी कंपनीची बदनामी नको या भीतीने प्रकरण गुंडाळले काही जागृत ग्राहक तक्रारही नोंदवतात; पण त्यांच्या हाती शेवटी निराशाच लागते. त्यातून काहीही निष्पन्न होत नाही. वाहनाची संख्या दिवसेंदिवस वाढत आहे.अधिक पैसे घेऊन कमी इंधन देणे, शुद्ध डिझेल, पेट्रोलचा अभाव, वाहनात पेट्रोल टाकताना केली जाणारी चलाखी यामुळे वाहनधारकांची सर्रास लूट केली जाते.याबाबत कुणाचेही कठोर नियंत्रण दिसत नाही. ज्यांनी नियंत्रण ठेवायचे असते त्यांना अगोदरच हप्ता ठरवून दिलेला असतो. त्यामुळे फार तर एखाद्या शिस्तप्रिय जिल्हाधिकाऱ्याच्या देखरेखीत चार-सहा पेट्रोल पंपांवर छापे मारून नमुने घेतले जातात.त्याची बातमी छापून येते. पुढे याचे काय होते हे कुणालाही कळत नाही. ग्राहक बिचारा आपल्याला शुद्ध इंधन मिळते, असे भ्रामक समाधान मानून भगवान भरोसे वाहन चालवत असतो!

डी. बी. जगत्पुरिया
संपर्क क्र. 98604485348

पेट्रोलमध्ये नाफ्ता आणि डिझेलमध्ये रॉकेल असल्याच्या अनेक तक्रारी ऐकायला मिळतात. मशिनमध्ये एक विशिष्ट आकाराची रचना असल्याचेही बोलले जाते. त्यामुळे मीटरवर आकडा बरोबर दिसतो पण ग्राहकाला मात्र कमी इंधन मिळते. या क्रमांकावर तक्रार करावी, अशी सूचना काही ठिकाणी वाचायला मिळते; पण तक्रार करणाऱ्यांकडेच पुरावा मागून जागृत ग्राहकाला वेठीस धरलं जातं. सर्वाधिक पेट्रोल पंप हे राजकीय पुढाऱ्यांच्या, बड्या अधिकाऱ्यांच्या, धनदांडग्यांच्या मालकीचे आहेत. काही सुरक्षितता म्हणून ते नातलगांच्या वतीने घेऊन ठेवले आहेत. मालकांसाठी हा व्यवसाय सोन्याची खाण ठरला असला तरी सामान्य ग्राहकांसाठी तो शोषणाचे, लुटीचे केंद्र ठरत आहे. आता ग्राहकांनीच आठवड्यातून एकदा तरी इंधनाचे नमुने सक्तीने तपासण्याची मागणी केली पाहिजे. ते विश्वासार्ह प्रयोगशाळेतून तपासून घेतले पाहिजेत. भेसळ आढळल्यास संबंधित पेट्रोल पंपाची मान्यता रद्द करायला हवी. मशिन प्रमाणित आहे, की नाही याचीही खात्री करायला हवी.असे कठोर उपाय योजले तरच सामान्य ग्राहकांची लूट थांबेल. अनेक सामान्य लोक आज परवडत नसले तरी नोकरीच्या स्थळी वेळेवर पोहोण्यासाठी, वेळेची बचत करण्यासाठी वाहन वापरतात.अनेकदा अशुद्ध इंधनामुळे वाहन खराब होते.वाहनधारकाला त्याचा भुर्दंड सोसावा लागतो. ग्राहकांना शुद्ध इंधन मिळेल यासाठी सुस्तावलेल्या यंत्रणेनेही बदलण्याची गरज आहे.त्याशिवाय शोषणाचे दुष्टचक्र थांबणार नाही. यासाठी अधिकाऱ्यांनाही दोषी धरायला हवं!

**(लेखक विख्यात कवी समीक्षक ज्येष्ठ पत्रकार आहेत)**

# देशातील प्रदूषण धोकादायक वळणावर



मच्छिंद्र ऐनापुरे
जत, जि. सांगली

आधुनिक केसरी

**देशात प्रदूषणाची समस्या गंभीर बनत चालली आहे. वास्तविक प्रदूषणाचे अनेक प्रकार आहेत. वायू प्रदूषण, जल प्रदूषण, ध्वनी प्रदूषण, माती प्रदूषण, अन्न प्रदूषण इ. परंतु धूर, धूळ आणि आवाजामुळे होणारे प्रदूषण ज्या प्रकारे धोकादायक रूप धारण करत आहे, ते अतिशय चिंताजनक आहे. अलिकडेच अमेरिकेतील शिकागो विद्यापीठात 'एअर क्वालिटी इंडेक्स' या हवेच्या गुणवत्तेबाबत केलेल्या अभ्यासात बांगलादेशानंतर भारत हा दुसऱ्या क्रमांकाचा प्रदूषित देश असल्याचे समोर आले आहे.भारतातील नव्वद टक्क्यांहून अधिक लोक प्रदूषित हवेत श्वास घेत आहेत. यापैकी 63 टक्के लोक (सुमारे 70 कोटी) तांत्रिकदृष्ट्या अत्यंत धोकादायक वायू प्रदूषणाचे बळी ठरत आहेत. याचा परिणाम असा झाला आहे की भारतीयांचे सरासरी वय पाच वर्षांनी घटले आहे. उत्तर भारतात सरासरी वय साडेसात वर्षांनी कमी झाले आहे तर देशाची राजधानी दिल्लीतील लोकांचे सरासरी वय दहा वर्षांनी कमी झाले आहे.**

एवढेच नाही तर जागतिक पातळीवर प्रदूषण वाढवण्यात भारताचा वाटा 44 टक्के असल्याचेही या अभ्यासात म्हटले आहे. जागतिक आरोग्य संघटनेच्या (डब्ल्यूएचओ) म्हणण्यानुसार हवेतील सूक्ष्म कणांची मात्रा (पीएम) चे प्रमाण अडीच ते पाच मायक्रोग्रॅम दरम्यान असायला हवे, परंतु 2020 मध्ये भारतातील बहुतेक भागात हे प्रमाण 76.2 मायक्रोग्रॅम प्रति घनमीटर आहे. म्हणजेच कमाल विहित मर्यादेपेक्षा पंधरा पट जास्त आहे. अनेक अभ्यासांनी पाचोळा ज्वलनामुळे होणाऱ्या वायू प्रदूषणाच्या आरोपाचे खंडन केले आहे आणि असे म्हटले आहे की एकूण वायू प्रदूषणात शेतातील पाचोळा जाळल्याने होणाऱ्या धुराचा वाटा जेमतेम चार टक्के आहे, तर वाहनांच्या धुराचे प्रदूषण साठ टक्क्यांहून अधिक आहे. कारखान्यांच्या प्रदूषणापेक्षाही हे प्रमाण जास्त आहे.

विशेष म्हणजे सुमारे चाळीस-पन्नास वर्षांपूर्वी कारखान्यातील धुराचे प्रदूषण सर्वाधिक होते. कारखान्यांमधून निघणाऱ्या धुरामुळे मुंबईतील चेंबूर परिसर 'गॅस चेंबर' म्हणून ओळखला जाऊ लागला. कोळसा निर्मितीची ठिकाणे, सिमेंट कारखाने आणि चुन्याच्या कामाच्या ठिकाणाहून निघालेल्या कोळशाच्या आणि धुळीच्या कणांचा प्रभाव इतका मोठा आहे की घरांवर आणि शेतजमिनीवर,पिकांवर कोळशाचा काळा थर, सिमेंट किंवा एस्बेस्टोस भागात चुन्याचा पांढरा थर पाहायला मिळतो. औष्णिक वीज केंद्रातून निघणाऱ्या राखेतून छत्तीसगडच्या हसदेव नदीच्या पाण्याचा रंग पांढरा होऊन दुधासारखा दिसतो. स्पंज आयर्न आणि स्टील उत्पादनाचे प्रमुख केंद्र असलेल्या रायगड जिल्ह्यात धूळ, धूर आणि प्रचंड वेगाने धावणाऱ्या डंपरमुळे सर्वसामान्यांचा जीव नेहमीच धोक्यात असतो. त्यामुळे विकासाच्या या प्रकारांवरही प्रश्न निर्माण होतात.

दिल्लीतील वायू प्रदूषणाचे मुख्य कारण म्हणजे वाहनांचा धूर. परिस्थिती इतकी गंभीर आहे की या वायू प्रदूषणामुळे प्रत्येक वयोगटातील लोक अगदी लहान मुले गंभीर आजारांना बळी पडत आहेत. हिवाळ्याच्या सुरुवातीला ही परिस्थिती अधिकच बिकट होते. जेव्हा हा प्रश्न शासन व्यवस्थेसमोर येतो आणि गंभीर स्वरूप धारण करतोय असे दिसते, तेव्हा सत्ताकेंद्रे काही बोलके आणि दिखाऊ उपाय सुरू करतात, पण कायमस्वरूपी तोडगा काढण्याच्या दिशेने कोणीही हालचाल करताना दिसत नाही.दिल्लीचा धूर जेव्हा सीमा ओलांडू लागतो आणि उच्चभ्रू आणि त्यांच्या कुटुंबीयांवर परिणाम करू लागतो, तेव्हा ही चिंता



सत्ताधारी व्यवस्थेला रास्त वाटू लागते. आज दिल्लीत एक कोटीहून अधिक वाहने आहेत. एकाच कुटुंबात अनेक वाहने ठेवण्याच्या प्रथेमुळे हा त्रास वाढला आहे. महत्त्वाचा मुद्दा म्हणजे इथले श्रीमंत लोक स्वतःचे हित आणि सुविधा यालाच प्रथम प्राधान्य देताना दिसतात.

अशा परिस्थितीत सरकार काय करू शकते, असा प्रश्न उपस्थित होतो. वायू प्रदूषण नियंत्रित करण्यासाठी व्यावहारिक दृष्टिकोनातून कोणती पावले उचलली जाऊ शकतात? मात्र, या समस्येतून सुटका करण्यासाठी दिल्लीत सम-विषम प्रणाली सुरू करण्यात आली. मात्र राजकीय कारणांमुळे आणि बहुसंख्य लोकांच्या विरोधामुळे हा प्रयोग यशस्वी होऊ शकला नाही. या व्यवस्थेमुळे रस्त्यांवरील वाहनांचा दाब कमी होऊन हवेतील प्रदूषणही कमी झाले असते, हे निश्चित. परंतु असे प्रयोग प्रत्यक्षात आणण्यासाठी सार्वजनिक वाहतूक व्यवस्था मजबूत करणे आवश्यक आहे, ज्याचा बहुतांश शहरांमध्ये अभाव आहे.ध्वनी प्रदूषणाचा विचार केला तर असे दिसून येते की,शहरांमधील हॉर्न आणि वाहनांचा आवाज लोकांना बहिरेपणाच्या समस्येकडे ढकलत असल्यासारखी परिस्थिती आहे. समाजाचा सनातनी स्वभाव, नागरी जाणिवेचा अभाव, दुष्कृत्ये, अंधश्रद्धा हीदेखील यामागची कारणे आहेत. नियमांची पायमल्ली करून लाऊडस्पीकरचा वापर ही काही नवीन समस्या नाही. रात्री दहा किंवा अकरा वाजल्यानंतर त्यांच्या वापरावर बंदी घालण्याचा नियम बहुतांश ठिकाणी लागू आहे.पण तरीही रात्री उशिरापर्यंत त्यांचा आवाज ऐकू येतो. डीजेचा मोठा आवाज इतका जीवघेणा आहे की आजूबाजूची घरेही हादरल्यासारखी वाटतात. मात्र आश्चर्याची बाब म्हणजे असे करणाऱ्यांवर क्वचितच कारवाई होते. आम्हाला माहिती मिळाली नाही असे पोलिस म्हणू शकतात. पण दुसरी बाजू अशीही आहे की शेजाऱ्यांची तक्रार करणेही तसे अवघड काम आहे. कुटुंबप्रमुखाने स्वतः यात लक्ष घालून आपल्या मुलांना रोखले पाहिजे. काही लोक तक्रार करणाऱ्याला दमदाटी करतात. काही लोक शुभ कार्य आहे, सांभाळून घ्या असं सांगतात. मात्र आजूबाजूला राहणाऱ्या आजारी माणसांचाही विचार व्हायला हवा आहे.

रासायनिक खतांच्या वापरामुळे जमिनीची सुपीकता नष्ट होत आहे. माणसाला धान्य, फळे, पाण्यातून विष मिळत आहे. परिस्थिती अशी आहे की आपण विष खात आहोत, विष पीत आहोत, विष पेरत आहोत आणि विष तोडत आहोत. त्यामुळे विषारी श्वास घेणे आणि असह्य आवाजाला बळी पडणे, या समस्या कशा सोडवता येतील, असा प्रश्न उपस्थित होतो. हे अवघड काम आहे असे नाही. नागरी व्यवहाराची थोडीशीही समज निर्माण झाली आणि स्थानिक प्रशासनाने लोकांबरोबरच सहकार्याची वृत्ती अंगीकारली तर आपण आपल्या आजूबाजूचे वातावरण प्रदूषणमुक्त करू शकतो. शेतीसाठी रासायनिक खतांचा वापर अपरिहार्य आहे, तर निदान त्याचा वापर मर्यादित करू शकतो,जेणेकरून लोकसंख्येच्या तुलनेत अन्नधान्याची उपलब्धता होईल आणि लोकांना विषमुक्त धान्य, अन्नधान्य, फळे आणि भाजीपाला मिळू शकेल. . रासायनिक खतांचा वापर न करता शेती करणाऱ्या शेतकऱ्यांचे कमी उत्पादनामुळे नुकसान होऊ नये, म्हणून त्यांच्या पिकाची किंमत ठरवताना ही बाब लक्षात घेतली पाहिजे. सेंद्रिय अन्न धान्याला दर चांगला मिळाला पाहिजे. वायू प्रदूषणावर नियंत्रण ठेवण्यासाठी वाहनांमधून निघणारा धूर रोखण्याच्या मार्गांचा विचार करणे आवश्यक आहे. मात्र, आता इलेक्ट्रिक वाहनांवर भर दिला जात आहे. पण त्यासाठी अजून बराच वेळ जाणार आहे. जिथे खाजगी वाहनांची संख्या खूप जास्त आहे तिथे 'एक कुटुंब एक गाडी' या नियमाचा विचार करता येईल. मात्र, हे सोपे नाही आणि लोकांच्या पातळीवर प्रचंड विरोध तर होऊ शकतोच, पण कार निर्मातेही वैतागून जातील. त्याचप्रमाणे सौरऊर्जा देशात विपुल प्रमाणात उपलब्ध आहे. या दृष्टिकोनातूनही काम सुरू आहे. त्याला वेग आला पाहिजे. अशा परिस्थितीत सरकारने प्रत्येक स्तरावर लोकांना आणि उद्योगांना प्रोत्साहन दिले पाहिजे, जेणेकरून स्वस्त आणि प्रदूषणमुक्त ऊर्जा मिळू शकेल.

# राज कपूर : हिंदी चित्रपट सृष्टीतील पहिले "शोमन"



सुरेश सिरसीकर
संपर्क क्र. 9146040000

आधुनिक केसरी

राज कपूर हे हिंदी सिनेमातलं मोठं प्रस्थ. राज कपूर हे हिंदी सिनेमातले पहिले "शोमन". जवळपास सर्वच चित्रपट त्यांची गाजलेली आहेत. आवरा, श्री ४२०, बॉबी, आह, संगम असे कित्येक चित्रपट सांगता येतील. त्यांच्या चित्रपटाची मजबूत बाजू म्हणजे चित्रपटातील संगीत आणि गाणी. पण एक चित्रपट त्यांच्या जिव्हारी लागला. तो म्हणजे "मेरा नाम जोकर". खरं पाहायला गेलं तर "मेरा नाम जोकर" हा चित्रपट राज कपूर यांचा ड्रीम प्रोजेक्ट आणि बिग बजेट सिनेमा होता. त्यात रशियन प्रोडक्शन कंपनी पण राज कपूर सोबत पार्टनरशिपमध्ये होती. हा चित्रपट अपेक्षेप्रमाणे चालला नाही आणि राज कपूर मोठ्या कर्जात बुडाला. या सिनेमाची लांबी पाच तास होती. हेही एक कारण सांगितलं जातं, सिनेमा न चालण्याचं, चित्रपटाचे संगीत अपेक्षेप्रमाणे प्रचंड गाजले. हा चित्रपट भारतीय चित्रपटसृष्टीतील सर्वात लांब चित्रपटांपैकी एक चित्रपट आहे. मेरा नाम जोकर हा दुसरा आणि आजपर्यंतचा शेवटचा हिंदी चित्रपट आहे ज्यामध्ये दोन इंटरवल आहेत. पहिला संगम (१९६४). संगम ब्लॉकबस्टर ठरल्यानंतर, मेरा नाम जोकरची खूप मोठी अपेक्षा होती कारण ती सहा वर्षे निर्मितीखाली होती आणि राज कपूरच्या स्वतःच्या जीवनावर आधारित, मोठ्या प्रमाणावर प्रसिद्धी केली गेली होती.

हा चित्रपट अंशतः सोव्हिएत कलाकारांच्या सहभागाने बनवण्यात आला होता आणि त्याचे अंशतः मॉस्कोमध्ये चित्रीकरण करण्यात आले होते. चित्रपटाचे संगीत, अजूनही खूप लोकप्रिय आहे, शंकर जयकिशन यांनी संगीतबद्ध केले होते, ज्यासाठी या जोडीला त्यांचा नववा फिल्मफेअर पुरस्कार मिळाला. भारतात, रिलीज झाल्यावर हा चित्रपट गंभीर आणि व्यावसायिक अपयशी ठरला, ज्यामुळे कपूरला आर्थिक संकटात टाकले, कारण चित्रपटाची लांबी आणि कथानक यावर आधारित होते. चित्रपटाची रिलीज डेट १८ डिसेंबर १९७० होती.

१९८० च्या दशकात एक संक्षिप्त आवृत्ती रिलीज झाली आणि बॉक्स ऑफिसवर ती अत्यंत यशस्वी झाली. राजकपूर यांनी याला त्यांचा आवडता चित्रपट म्हटले आणि त्यात खोल दार्शनिक खोली आणि अर्थ असल्याचे वर्णन केले. हा चित्रपट आज राजकपूरच्या उत्कृष्ट कलाकृतींपैकी एक म्हणून ओळखला जातो आणि चित्रपट तज्ञांनी त्याला "गैरसमज झालेला उत्कृष्ट नमुना" असे लेबल लावले. हा चित्रपट नंतर एक कल्ट क्लासिक बनला आणि तो राज कपूरच्या सर्वोत्कृष्ट चित्रपटांपैकी एक आणि २० व्या शतकातील सर्वोत्कृष्ट बॉलीवूड चित्रपटांपैकी एक म्हणून ओळखला जातो. सोव्हिएत युनियनमध्ये, चित्रपटाने सुरुवातीला समीक्षकांकडून मिश्र अशा




प्रतिक्रिया मिळाल्या. तरीही १९७२ मध्ये प्रदर्शित झाल्यानंतर तो सोव्हिएत बॉक्स ऑफिसवर व्यावसायिकदृष्ट्या ब्लॉकबस्टर बनला. एकच चित्रपट म्हणून प्रदर्शित होण्याऐवजी, चित्रपटाचे तीन अध्याय स्वतंत्रपणे तीन म्हणून प्रदर्शित केले गेले. चित्रपटाच्या तीन भागांनी एकत्रितपणे सोव्हिएत बॉक्स ऑफिसवर ७३.१ दशलक्ष तिकिटे विकली.

राजकपूरला या चित्रपटाकडून बरीच आशा होती. त्यांना चित्रपटाचा दुसरा भाग ही काढायचा होता पण प्रेक्षकांच्या पहिल्या थंड रिस्पॉन्स मुळे राज कपूर या चित्रपटाचा भाग काढू शकले नाहीत. मला जर विचारलं तर हा चित्रपट राज कपूरच्या चित्रपटांपैकी सर्वात आवडता माझा चित्रपट आहे.

**चित्रपटाला मिळालेली फिल्मफेअर पुरस्कार**

बेस्ट अक्टर - राज कपूर
बेस्ट संगीत - शंकर जयकिशन
बेस्ट प्लेबॅक सिंगर - मनाडे
बेस्ट छायाचित्रण - राधू करमकर
बेस्ट साऊंड डिझाईन - अल्लाउद्दीन खान

शासन मान्यता प्राप्त लिलाव भिशी U65929MH2017PTC296394
DC दिंडोरी चिट फंड प्रा.लि.
आपले जीवन आनंदमय जगा....
तुमच्या बचतीवर योग्य गुंतवणूक हप्त्याने भरा आणि एक रक्कम पैसे मिळवा.
कमीत कमी व्याज दर योग्य मोबदला एक रक्कमी पैसे मिळवा आणि हप्त्याने परतफेड करा.
• सेंट्रल ॲक्ट १९८२ नुसार मान्यता प्राप्त
• पासबुक व पावतीची सोय
• लिलाव भिशी बोलीची मर्यादा ५% ते ४०% पर्यंत
• सर्व व्यवहार धनादेशाद्वारे
संपर्क: श्री.सतीष देशपांडे मो. 9730527669, 9623556611, 0240-2481122

आरोग्याकडे दुर्लक्ष करु नका
आरोग्यम् धनसंपदा
शहरातील एक विश्वसनीय सुपर मार्केट
महावीर घर संसार
• घाऊक आणि किरकोळ
• किराणा, सुका मेवा, मसाले
• क्रॉकरी, घरगुती उपकरणे
• घर साफ करणारे साहित्य, स्टील आणि ॲल्युमिनियम
• प्लास्टिकच्या वस्तू आणि बरेच काही
सुमित 7620111118 राजेश जैन 7588348738
रमेश जैन (क्रॉकरी) 9860481142 7620111117
व्हॉट्सअप ऑर्डर आणि कोणतीही ऑर्डर 9850017181
वितरण स्थिती 9021395308 9657398232
घाऊक चौकशी 7620111118 9527111185
www.mahavirbestprice.com sumitparakh73@gmail.com
S.p. रोड, चेलीपुरा, शहागंज, औरंगाबाद
प्लॉट क्रमांक A25, MIDC पोलिस स्टेशन समोर MIDC चिकलठाणा, औरंगाबाद

# शेतकऱ्यांना पीकविमा भरताना ई-पीक पाहणी सक्तीची नाही

आधुनिक केसरी न्यूज

**सोयगाव :** परिसरातील शेतकऱ्यांना यंदा पंतप्रधान पीक विमा योजना संपूर्ण औरंगाबाद जिल्हाभरात राबवली जात आहे. खरीप हंगाम २०२२ साठी ३१ जुलै ही अंतिम दिनांक पीकविमा भरण्यासाठी आहे. मात्र, विमा भरण्यासाठी ई पीक पाहणी नोंद आवश्यक असल्याचे सांगण्यात येत होते. त्यामुळे शेतकरी वर्गात संभ्रम निर्माण झाला होता. यावर राज्याचे कृषी आयुक्त धीरज कुमार यांनी प्रसिद्धीप्रकाद्वारे ही माहिती देऊन पडदा टाकला आहे. १ऑगस्टपासून ईपीक पाहणी नोंद करण्याची प्रक्रिया सुरू होणार आहे. त्यामुळे शेतकरी स्वयं घोषणापत्र जोडून पीकविमा भरू शकतात. अनेकदा पीकविमा भरलेले पीक आणि प्रत्यक्ष पीक यामध्ये तफावत आढळते. यामुळे शेतकरी पीकविम्याच्या रकमेपासून वंचित राहतात. हे टाळण्यासाठी ई-पिक पाहणीमधे केलेली नोंद अंतिम ठरविण्यात येणार आहे. त्यामुळे शेतकऱ्यांना पिकविमा भरतांना ई-पीक पाहणीसक्तीची नसली तरी १ ऑगस्टनंतर ई-पीक पाहणी नोंद करणे शेतकऱ्यांच्या दृष्टीने फायदेशीर ठरणार आहे. देशातील शेतकऱ्यांच्या पिकांचे नैसर्गिक आपत्तीमुळे अनेकदा शेतकऱ्यांचे मोठे प्रमाणात नुकसान होते. असे नुकसान झाल्यानंतर पिकाला संरक्षण नसल्याने सरकार यांच्या मदतीच्या भरोसावर शेतकऱ्यांना बसावे लागते.
शासनाकडून मिळणारे अनुदान देखील तुटपंजे असते यावर उपाय म्हणून शेतकऱ्यांच्या पिंकाला संरक्षण देणाऱ्या प्रधानमंत्री पीक विमा योजनेची आखणी करण्यात आली.

### 'कप अँड कँप मॉडेल' यंदा राबविले जाणार

**अधिसूचित क्षेत्रातील अधिसूचित पिकासाठी राबविण्यात येणार असून यानुसार शेतकऱ्यांचे जास्त नुकसान झाल्यास विमा कंपनी ११० टक्के रक्कम नुकसान भरपाई म्हणून देईल तर कमीतकमी नुकसान झाल्यास २० टक्के प्रशासकीय खर्च कपात करून बाकी रक्कम शासनाला परत करेल. त्यामुळे या 'कप अँड कँप मॉडेल' या मॉडेलचा ८०-११० असा फॉंम्र्युला आहे.**

**संगीता पवार, कृषी अधिकारी सोयगाव**



# सपोनि. सुदाम शिरसाटसह पंडित, सरताडे, बरडे यांना गौरवपत्र प्रदान

आधुनिक केसरी न्यूज

**सोयगाव :** पोलीस स्टेशनचे तात्कालीन सहाय्यक पोलीस निरीक्षक सुदाम शिरसाट, पोलीस उपनिरीक्षक सतीश पंडित, पो.ना. ज्ञानेश्वर सरताळे, पो.ना.राजू बरडे यांच्या उत्कृष्ट कामगिरीबद्दल गौरवपत्र प्रदान करण्यात आले. हा पुरस्कार औरंगाबाद ग्रामीण पोलीस अधीक्षक मनीष कलवानिया यांच्या हस्ते प्रदान करण्यात आला.
सोयगाव पोलीस स्टेशन येथील गुरन.८१/२२ कलम-४५४, ३८०, या गुन्ह्याचा तपास तत्कालीन सपोनि. सुदाम शिरसाट, पोलीस उपनिरीक्षक सतीश पंडित, ज्ञानेश्वर सरताळे, राजू बरडे यांनी तपास करून अज्ञात आरोपीचा शोध घेऊन दोन आरोपी यांना अटक करून १०.७५० ग्राम सोने व २०००० रोख हस्तगत केला. या घटनेचा तपास बारकाईने तपास करून सदर आरोपीस न्यायालयात हजर केले होते.या कामगिरीबद्दल त्यांना पोलीस अधीक्षक औरंगाबाद ग्रामीण मनीष कलवानिया यांच्या हस्ते त्यांना प्रशस्तीपत्र देऊन सन्मान केला. तसेच भविष्यातही अशाच उत्कृष्ट कामगिरीची अपेक्षा व्यक्त केली.

# ९० लाखांच्या पाईपलाईनला मंजुरी

## सौ.सारिका अग्रवाल यांचा कामाचा धडाका

आधुनिक केसरी न्यूज

**धुळे :** अवधान गावात पाणीपुरवठा करण्यासाठी अंतर्गत वितरण पाईपलाईन टाकण्याच्या कामाला आज मनपा स्थायी समिती सभेत मंजूरी देण्यात आली. ९० लक्ष रुपयांचा निधी नागरी दलीत वस्ती पाणीपुरवठा योजनेतंर्गत यासाठी मंजूर करण्यात आला. मक्तेदारास कार्यादेश देत १५ दिवसात प्रत्यक्ष कामाला सुरुवात होणार आहे, अशी माहिती नगरसेविका सारीका अग्रवाल व भाजपा मंडल अध्यक्ष प्रविण अग्रवाल यांनी दिली आहे.
धुळे शहर हददीतील अवधान गावाचा पिण्याच्या पाण्याचा प्रश्न कायम स्वरूपी निकाली काढण्याचा शब्द महापालिका निवडणुकीवेळी प्रविण अग्रवाल यांनी दिला होता. तो पुर्ण करण्यासाठी भाजपा नगरसेविका सौ. सारीका अग्रवाल व भाजपा मंडल अध्यक्ष प्रविण अग्रवाल यांनी भाजपा नेते खा.डॉ. सुभाष भामरे, आ.राजवर्धन कदमबांडे, जिल्हाध्यक्ष अनुप अग्रवाल, माजी महापौर चंद्रकांत सोनार, विद्यमान महापौर प्रदीप कर्पे, स्थायी समिती सभापती शितल नवले यांच्या मार्गदर्शन व पाठींब्याने सातत्याने पाठपुरवा करीत आहेत.
त्यांच्या प्रयत्नांना यश येवून अवधान गावात घराघरापर्यंत नळाव्दारे पाणी पोहचवण्यासाठी ९० लक्ष रुपयांच्या वितरण पाईपलाईन टाकण्याचे काम आजच्या स्थायी समितीत मंजूर करुन घेतले आहे. आजच्या स्थायी समितीच्या अंजेडयावरील विषय क्र.११४ अवधान येथे नागरी दलित वस्ती पाणीपुरवठा योजने अंतर्गत ९० लक्ष रुपयांची निविदा दर मागविण्यात आले होते. त्यामध्ये मक्तेदार अंकित भंडारी यांचे अंदाजपत्रिका दराने निविदा दर असल्या कारणाने स्थायी समितीत सभापती यांनी अवधान गावात पिण्याची पाईपलाईन वितरण व्यवस्थेसाठी नागरीकांच्या सुविधेसाठी ९० लाख रुपयांना मंजूरी दिली.
येत्या १५ दिवसांत ठेकेदाराला कार्यादेश देवून प्रत्यक्ष कामाला



सुरुवात होणार आहे. नगरसेविका सौ. सारीका प्रविण अग्रवाल यांनी महानगरपालिका निवडणुकीत अवधान ग्रामस्थांना दिलेला शब्द पुर्णत्वाकडे नेत आहे. विशेष म्हणजे अवधान गावाचा पाणी प्रश्न निकाली काढण्यासाठी गेल्या वर्षीच ५ लाख लिटर जलक्षमतेचा जलकुंभ बांधण्यात आला आहे. तसेच डेडरगाव जलशुध्दीकरण केंद्रावरुन ५ कोटी रुपयांची पाईपलाईन अवधान गावापर्यंत टाकण्यात आली आहे. या पाईपलाईनचे पाणी व्यवस्थीत गावात पोहचावे यासाठी मनुदेवी मंदिर ते अवधान गावाच्या दरम्यान अहिल्यादेवी शाळेजवळ एक पंपसेट बसवण्यात येत आहे. त्यामुळे गावापर्यंत पाणी व्यवस्थित पोहचेल, आता गावात अंतर्गत पाणी वितरणासाठी आवश्यक पाईपलाईन टाकण्यासाठी पाठपुरावा करीत नगरसेविका सारिका अग्रवाल यांनी नागरी दलीत वस्ती पाणीपुरवठा योजनतंर्गत ९० लक्ष रुपयांचा निधी सुध्दा मंजूर करून घेतला आहे. त्यामुळे अवधान गावाचा पाणीप्रश्न येत्या दिवाळीपर्यंत कायमस्वरूपी निकाली निघण्याचा मार्ग मोकळा झाला असल्याची प्रतिक्रीया मंडल अध्यक्ष प्रविण अग्रवाल यांनी दिली आहे.
अवधान गावात घराघरात नळांचे स्वच्छ पाणी पोहचणार आहेच, त्यासोबतच गावातील अंतर्गत विहीरी, बोअरवेल यांना सुध्दा मुबलक पाणी यावे म्हणून गेल्या वर्षीच माॅ जिजाऊ तलावाचे खोलीकरण करण्याचे काम प्रविण अग्रवाल यांनी मनपा आणि नाम फाऊंडेशनच्या सहकार्याने केले आहे.

# अखंड हरिनाम सप्ताह हे तर सद्‌गुरूंचे धर्मकार्य : महंत रामगिरीजी महाराज

## कोकमठाण येथे गंगागिरीजी महाराज यांच्या 175 व्या सप्ताहाचे धर्म ध्वजारोहण उत्साहात

आधुनिक केसरी न्यूज

**गंगापूर :** आशिया खंडातील सर्वात मोठा अखंड हरिनाम सप्ताह ज्याची गिनीज बुक ऑफ इंडिया मध्ये नोंद असलेला यावर्षी कोकमठाण या पवित्र तिर्थक्षेत्री नेहमीच्या सप्ताहाच्या प्रथेप्रमाणेच हा ध्वज उंच हवेत दिमाखात फडकला गेला. कोकमठाण तालुका कोपरगाव येथे आज महंत रामगिरीजी महाराज यांच्या शुभहस्ते धर्म ध्वजारोहण हजारो भाविकांच्या उपस्थितीत उत्साहात पार पडले.
याप्रसंगी हजारो उपस्थित भाविकांना मार्गदर्शन करताना महंत रामगिरीजी महाराज म्हणाले की, योगीराज सद्‌गुरु गंगागिरी महाराज यांनी प्रतिकूल परिस्थितीत हा अखंड हरिनाम सप्ताह लेने को हरिनाम देने को अन्नदान या उक्ती प्रमाणे सुरू केला. अखंड हरिनाम सप्ताह हे तर सद्‌गुरु चे धर्मकार्य आहे हे आपण सर्वांनी तन मन धन लावून पुढे सुरू ठेवले पाहिजे, गंगागिरी महाराज यांनी अध्यात्मिक वारकऱ्यांसह समाजाला एक नवी दिशा दिली. योगीराज गंगागिरी महाराज यांची ही सप्ताहाची परंपरा दोनशे वर्षापासून अविरत सुरू आहे. महाराष्ट्रात अनेक परंपरा खंडित झाल्या मात्र आपले स्वतःची परंपरा अविरत सुरूच राहील असे महाराज म्हणाले.



यावेळी जंगलीदास महाराज आश्रमाचे रमेश गिरी महाराज, आमदार आशुतोष काळे, विवेक भैय्या कोल्हे, माजी अर्थ व बांधकाम सभापती संतोष जाधव, शिक्षण व आरोग्य सभापती अविनाश पाटील गलांडे, माजी नगराध्यक्ष साबेर भाई खान, बाळासाहेब संचेती, विशाल संचेती, नागेबाबा पतसंस्थेचे संस्थापक कडू भाऊ काळे, राजेश परजणे, कमलाकर कोते, सराला बेटाचे विश्वस्त मधुकर महाराज, दत्तु खपके आदींसह बेटातील शिष्य गण पंचक्रोशीतील हजारो वारकरी, भाविक, सप्ताह कमिटीचे अध्यक्ष, उपाध्यक्ष यांच्यासह सर्व पोलीस प्रशासन, महसूल प्रशासकीय अधिकारी उपस्थित होते.

# वार्ताहर कल्याणकारी महामंडळ निर्माण करा

## उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना निवेदन

आधुनिक केसरी न्यूज

**मुंबई :** वृत्तपत्र, वेब चॅनल, इलेक्ट्रॉनिक्स मीडिया यांना आर्थिक विकासाच्या प्रवाहात आणण्यासाठी व सदरच्या प्रसार माध्यमात काम करणाऱ्या वार्ताहर, पत्रकारांसाठी वार्ताहर कल्याणकारी महामंडळ निर्माण करण्यासंदर्भात पत्रकार संघाचे मंत्रालय मुख्य संपर्कप्रमुख नितीन जाधव यांनी उपमुख्यमंत्री फडणवीस यांना निवेदन दिले. तसेच वृत्तपत्रातील प्रतिनिधी, वार्ताहर, बातमीदार यांना पत्रकारांचे तसेच वृत्त संस्थेचे वेगवेगळे प्रश्न सोडविण्यासाठी विधान परिषदेवर ही संधी देण्यात यावी अशी मागणी यावेळी करण्यात आली.
महाराष्ट्र राज्य मराठी पत्रकार संघाने मागील दहा वर्षापासून वार्ताहर कल्याणकारी महामंडळ तसेच पत्रकारांना विधान परिषदेवर संधी देण्याबाबतचा मुद्दा उचललेला आहे. महायुतीच्या काळात तत्कालीन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी वार्ताहर कल्याणकारी महामंडळासाठी सकारात्मकता दाखवली होती, याचाच दाखला देत आज त्यांना त्याबाबत आणखी एकदा विनंती करण्यात आलेली आहे. महाराष्ट्र राज्य मराठी पत्रकार संघ पत्रकारांचे प्रश्न सोडवण्यासाठी त्यांना न्याय हक्क मिळवून देण्यासाठी नेहमीच कटिबद्ध राहिलेला आहे याची मला जाणीव आहे. आपले दोन्ही मुद्दे विषयी मुख्यमंत्री यांच्याशी चर्चा करून मार्ग काढण्यासंबंधीच्या सूचना आपणास कळविण्यात येतील. वार्ताहर कल्याणकारी महामंडळासाठी स्वतः सकारात्मक असल्याचे उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी नितीन जाधव यांच्याशी बोलताना सांगितले.
काल मंत्रालय मुख्य संपर्क प्रमुख नितीन जाधव यांनी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांचे सोबत वार्ताहर कल्याणकारी महामंडळ निर्माण व्हावे यासंबंधी चर्चा केलेली आहे. त्यास मुख्यमंत्री महोदयांनी सकारात्मक प्रतिसाद दिलेला दिसून आला. मागील अनेक वर्षापासून महाराष्ट्र राज्य मराठी पत्रकार संघ पत्रकारांच्या न्याय हक्कासाठी शासन दरबारी त्यांच्या अनेक प्रश्न मार्गी लावत आलेला आहे. तसेच येणाऱ्या पुढील काळात पत्रकारांचे प्रश्न वृत्तपत्राचे प्रश्न वेब इलेक्ट्रॉनिक मीडियातील इतर सह कर्मचाऱ्यांचे प्रश्न व अडीअडचणी सोडविण्यासाठी वार्ताहर कल्याणकारी महामंडळ कायमस्वरूपी उपयोगी ठरणार आहे.



# 524 नवीन पंतप्रधान आवास योजनेतील घरकुलधारकांना मंजुरी द्यावी

## माजलगाव शहरातील नवीन घरकुल लाभार्थ्यांचे घरकुलाचे स्वप्न होणार साकार

आधुनिक केसरी न्यूज

**माजलगाव :** पंतप्रधान आवास योजनेतील 524 नवीन घरकुलधारकांना त्वरित मंजुरी द्यावी, अशी मागणी पंतप्रधान आवास योजनेच्या मुंबई येथील गृहनिर्माण कार्यालयाकडे निवेदनाद्वारे माजी नगराध्यक्ष शेख मंजूर यांनी केली आहे.
दिलेल्या निवेदनात नमूद करण्यात आले आहे की, माजलगाव नगरपरिषद मार्फत पंतप्रधान आवास योजनेअंतर्गत अंदाजे 524 नवीन घरकुलधारकांना केंद्राकडून मंजुरी भेटली आहे. त्यासाठी माझ्या नगराध्यक्ष पदाच्या कार्यकाळात मे 2021 मध्ये तिसऱ्या डीपीआरसाठी शहरातील नागरिकांचे नगरपरिषदमध्ये पंतप्रधान आवास योजनेअंतर्गत नवीन फॉर्म घेण्याची सुरुवात केली. यामध्ये न.प. कार्यालयामार्फत स्वीकारण्यात आलेले फॉर्म ऑनलाइन भरण्यात आले. घरकुलधारकांच्या भरलेल्या फॉर्मला केंद्र शासनाकडून मंजुरी मिळाली.
परंतु अद्याप राज्य शासनाकडून मंजुरी मिळाली नसल्यामुळे माजलगाव नगरपरिषद अंतर्गत येणाऱ्या लाभार्थ्यांच्या खात्यामध्ये पैसे वर्ग करण्यात आले नाहीत. पुढे नगरपरिषद निवडणुकीचा कार्यकाळ असल्याने आचारसंहिता लागण्याची शक्यता आहे.
त्यामुळे राज्य शासनाने मंजूर लाभार्थ्यांचा पहिला हप्ता त्वरित द्यावा, जेणेकरून नागरिकांची घरकुलाची कामे वेळेवर सुरू होतील, असे निवेदन गृहनिर्माण विभाग मुंबई यांच्या कार्यकारी अभियंत्याकडे माजी नगराध्यक्ष शेख मंजूर यांनी निवेदनाद्वारे केले आहे.

**530 घरकुल लाभार्थ्यांना 7 कोटी रुपये वाटप केल्याचे समाधान**

माझ्या नगराध्यक्ष पदाच्या कार्यकाळात पहिल्या डीपीआर मध्ये 566 पैकी 434 घरकुलधारकांनी बांधकाम परवानगी काढली होती. दुसऱ्या डीपीआर मध्ये 578 पैकी 340 घरकुल लाभार्थ्यांनी बांधकाम परवाना घेतला होता. यातील शिल्लक राहिलेल्या लोकांनी नगरपरिषदेकडून बांधकाम परवानगी घ्यावी व आपले घराचे स्वप्न साकार करावे, असे आव्हान माजी नगराध्यक्ष शेख मंजूर यांनी केले. दरम्यान यावेळी त्यांनी 530 घरकुल लाभार्थ्यांना 7 कोटी रुपये वाटप केल्याचे समाधान वाटत असल्याचे नमूद केले.





पैठण : राष्ट्रपतीपदाच्या निवडणुकीत द्रौपदी मुर्म या विजयी होताच पैठण शहरातील बसस्थानक परिसरात अदिवासी समाजाच्या वतीने फटाके फोडत जल्लोष साजरा करण्यात आला. यावेळी महाराष्ट्र राज्य एकलव्य संघटनेचे प्रदेशकार्य अध्यक्ष अशोक बर्डे, भाजपा जिल्हा सरचिटणीस लक्ष्मण औटे यांच्या प्रमुख उपस्थितीत फटाके फोडत आनंद साजरा करण्यात आला. यावेळी माजी उपनगराध्यक्ष भाऊसाहेब बोरूडे, सखाराम बरडे, मोतीलाल घुंगासे, सरपंच गणेश गायकवाड, आरुण मोरे, अशोक कुंढारेसह मोठ्या संख्येने आदिवासी बांधव उपस्थित होते.

# सत्यशोधक महोत्सवाच्या अध्यक्षपदी हनुमान तुपसौंदर यांची निवड

आधुनिक केसरी न्यूज

**माजलगाव :** येथील सत्यशोधक साहित्य सम्राट अण्णाभाऊ साठे यांच्या जयंतीनिमित्त माजलगाव येथे होणाऱ्या सत्यशोधक महोत्सव पदी हनुमान (विठ्ठल) तुपसौंदर यांची एकमताने निवड डीपीआयचे बीड जिल्हाध्यक्ष अमोल शेरकर यांच्या उपस्थितीत झाली. कोरोना परिस्थितीमुळे मागचे ३ वर्ष झाले जयंती उत्साहात साजरी करण्यात आली नाही. त्यामुळे ह्यावर्षी अनेक सामाजिक कार्यक्रमाने धुमधडाक्यात माजलगाव शहर व परिसरात जयंती साजरी करण्यात येणार असल्याचे अमोल शेरकर यांनी आज दि २१ रोजी झालेल्या बैठकीत सांगितले व विविध सांस्कृतिक कार्यक्रम घेऊन हा सत्यशोधक महोत्सव घेण्यात येणार आहे, तरी सर्वस्तरातील नागरिकांनी या जयंतीत सहभाग नोंदवावा, असे आव्हान जयंती अध्यक्ष हनुमान ऊर्फ विठ्ठल तुपासौंदर यांनी केले आहे. यावेळी केतन मिसाळ, विष्णू कांबळे, नितिन गायकवाड, दीपक शेरकर, राहुल हिवाळे, सुनील जाधव, अविनाश अवचार, नागेश हिवाळे, विजय शेरकर, विशाल खंडागळे, जगदीश थोरातसह अनेक तरुण यावेळी उपस्थित होते.



# ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांच्या शिक्षणावर भर देण्याची गरज -घुगे

## डॉ. भागवत कराड यांच्या वाढदिवसानिमित्त शालेय साहित्य वाटप




केंद्रीय अर्थराज्यमंत्री डॉ.भागवत कराड यांच्या वाढदिवसानिमित्त आयोजित कार्यक्रमाला विद्यार्थ्यांनसोबत शिक्षक, पालक व भाजपा कार्यकर्ते यांची मोठ्या प्रमाणात उपस्थिती होती.

आधुनिक केसरी न्यूज

कन्नड : तालुक्यातील जिल्हा परिषद प्रशाला कन्या व केंद्रीय शाळा पिशोर येथे केंद्रीय अर्थ राज्यमंत्री डॉ. भागवत कराड यांच्या वाढदिवसानिमित्त जिल्हा परिषद प्रशाला, जिल्हा परिषद प्रशाला कन्या व केंद्रीय शाळा पिशोर या ठिकाणी भारतीय जनता पार्टीचे युवा मोर्चा जिल्हा सरचिटणीस गणेश घुगे यांच्या वतीने शालेय साहित्य वाटप करण्यात आले यावेळी. या वेळी बोलताना घुगे म्हणाले की, ग्रामीण भागातील पालकांनी आपल्या पाल्याच्या शिक्षणाच्या बाबतीत लक्ष देने गरजेचे आहे. या युगात शिक्षण हे महत्वपूर्ण मानले जाते, पूर्वीच्या काळात अनेक व्यक्ती शिक्षणापासून वंचित होते, मात्र सध्याच्या काळात शासनाकडून विद्यार्थ्यांसाठी विविध योजना राबवून, कपड़े, वह्या, पुस्तके, त्यासोबत शालेय आहार पन देत आहे, आपली मुले शाळेत जातात की नाही, घरी दिलेला अभ्यास करतात की नाही, शाळेत शिक्षण कशा प्रकारे दिल्या जाते, यावर व्यक्तिक लक्ष देण्याची गरज आहे. यावेळी भाजपा जिल्हा उपाध्यक्ष संजय खंबायते, भाजपा जिल्हा सचिव डॉ. संजयजी गव्हाणे, तालुका अध्यक्ष भगवान कोल्हे, युवा मोर्चा तालुकाध्यक्ष प्रदीप बोडके, भाजपा कार्यालय मंत्री व्यंकटेश, माजी सरपंच डहाके, केंद्रप्रमुख दवंगे, संजय मुगले, प्रा.काकासहेब आड़े, गोविंद महाराज निकम, सोनजी आहेर, मुख्याध्यापक कोलते व त्यांचे सर्व सहकारी, कन्या शाळेच्या मुख्याध्यापिका हिवराळे, सुरेश पवार तसेच केंद्रीय प्राथमिक शाळेच्या मुख्याध्यापिका चव्हाण, काकुलते सर व त्यांचे सर्व सहकारी उपस्थित होते. यावेळी सर्व विद्यार्थ्यांना शालेय साहित्य वाटप करण्यात आले.तसेच भाजपा कार्यकर्ते पप्पू दवंगे, विठ्ठल कोल्हे नईम शेख, संदीप जाधव ,संपत घुगे, ग्रामपंचायत सदस्य भगवान जाधव, पाटील सर भाजपा कार्यकर्ते व ग्रामस्थ मोठ्या संखेने उपस्थित होते.



# जिल्ह्यात सर्वोकृष्ट कामगिरी करणाऱ्या पोलीस ठाण्यांचा गौरव

आधुनिक केसरी न्यूज



**औरंगाबाद :** औरंगाबाद ग्रामीणचे पोलीस अधीक्षक मनिष कलवानिया यांचे संकल्पनेतुन प्रत्येक महिण्याला जिल्हयातील सर्व 23 पोलीस ठाणे मधुन सर्वोत्कृष्ट गुन्हे निर्गती, सर्वोत्कृष्ट मुद्देमाल निर्गती, सी.सी.टी.एन. प्रमाणाली मध्ये 100 डाटा भरणे, अवैध धंद्याविरुध्द सर्वाधिक कारवाई, सर्वाधिक मिसिंग शोध, सर्वाधिक दोषसिध्दी, सर्वोत्कृष्ट कामगिरी करणारे अशा सात श्रेणीमध्ये सर्वोकृष्ट कामगिरी करणाऱ्या पोलीस ठाण्यांचा कामगिरी बद्दल गौरवचिन्ह व प्रशंसापत्र देवुन त्यांचा गौरव करण्याचा उपक्रम राबविण्यात येत आहे.

याअनुषंगाने मा. पोलीस अधीक्षक व अपर पोलीस अधीक्षक यांनी आज गुन्हे आढावा बैठकीमध्ये जिल्हयातील सर्व 23 पोलीस ठाणे यांचे गुणांकन पध्दतीने पोलीस ठाण्याची कामाची प्रतवारी करण्यात येवुन निकषांचे आधारे वरिल सात श्रेणी मध्ये उल्लेखनिय कामगिरीसाठी जुलै-2022 या महिण्या करिता गौरव चिन्हे व प्रशंसापत्र प्रदान केली ती पुढील प्रमाणे आहे.

सर्वोत्कृष्ट गुन्हे निर्गती : पोलीस ठाणे वैजापुर, 127 गुन्हे निर्गती. पो.नि. सम्राटसिंग राजपुत, सर्वोत्कृष्ट मुद्देमाल निर्गती : पोलीस ठाणे गंगापुर, 128 मुद्देमाल निर्गती पो.नि. संजय लोहकरे, सी.सी.टी.एन. प्रणालीमध्ये 100 डाटा भरणे : पोलीस ठाणे देवगाव (रं) स.पो.नि. अमोल मोरे, सर्व अवैध धंद्याविरुध्द कारवाई : पोलीस ठाणे खुलताबाद पो.नि. भुजंगराव हातमोडे, सर्वाधिक मिसिंग शोध : पोलीस ठाणे करमाड पो.नि. मुरलिधर खोकले व पोकॉ/ सुनिल गोरे, सर्वाधिक दोषसिध्दी : पोलीस ठाणे पिशोर व एम. पैठण प्रत्येक 08 गुन्हयात शिक्षा कोर्ट पैरवी सतिष देसाई (पिशोर), सफौ/ महेराज चाँद शेख (एम. पैठण), सर्वोत्कृष्ट पोलीस ठाणे : पोलीस ठाणे बिडकीन स.पो.नि. संतोष माने, सर्वोत्कृष्ट पोलीस ठाणे करिता निवड होणेसाठी प्रभारी अधिकारी यांना नमुद 96 निकषांची पुर्तता करून अधिकाअधिक गुण संपादन करणे अत्यावश्यक आहे.

अवैध व्यवसायांवर अधिक कारवाई- दारूबंदी, जुगार, आर्मस ॲक्ट, एन.डी.पी.एस. वाळु चोरी, पिटा, प्रलंबित गुन्हयांचे प्रमाण, प्रतिबंधात्मक कारवाई, पाहिजे फरार व फरारी आरोपी, कन्व्हीक्शन प्रमाण, समन्स व वॉरंट, गुन्हे उघड करण्याचे प्रमाण, मालमत्ता विषय गुन्हे, किंमती मुद्देमाल निर्गती, मोटार वाहन कायदा कारवाई, वरिष्ठ अर्ज निर्गती इत्यादी. निकषावर पोलीस ठाणे बिडकीन यांची कामगिरी सर्वोत्कृट ठरली आहे.

तसेच जिल्हयातील गुंतागुंतीचे व क्लिष्ट अशा गुन्हयांचा सचोटीने व शास्त्रशुध्द तसेच आधुनिक तंत्रज्ञानाचा त्याचप्रमाणे गोपनीय बातमीदार नेमून गुन्हयांची यशस्वी व उत्कृष्टपणे उकल करून आरोपी निष्पन्न करुन जेरबंद करणारे तपास अधिकारी व अंमलदार यांना प्रशंसापत्र देऊन त्यांच्या कौशल्ययुक्त तपासाचा गौरव करून त्यांचे पाठीवर कौतुकाची थाप दिली आहे.

पोलीस ठाणे पिशोर यांनी गोपनिय बातमीच्या आधारे एन.डी.पी.एस. कायद्यान्वये कारवाई करत 3,96,450/- रूपयांचा मुद्देमाल जपत केला होता. तसेच एक गावठी पिस्टल व 05 जिवंत कारतुस हस्तगत करून आरोपी अटक केले होते. यामध्ये पोलीस ठाणे पिशोर येथील स.पो.नि. कोमल शिंदे, पो.उप.नि. एस.डी. बडे, सफौ/ के.एफ. पटेल, एस. डकले, के.पी. म्हस्के, एल.टी. नागलोत. पोलीस ठाणे कन्नड शहर :- इम्प्रोवाईज्ड एक्सप्लोसिव्ह डिव्हाईस (I.E.D) मिळुन आला होता. तो निकामी करून आरोपीस अटक करण्यात आली आहे. मुकूंद आघाव, एस.डी. पी.ओ. कन्नड, रामेश्वर रेंगे, पो.नि. राजीव तळेकर, पो.नि. प्रदिप ठुबे, सतिष बडे, महेश घिर्डीकर, पो.उप.नि. पोलीस अंमलदार राम म्हात्रे, वसावे, कुलकर्णी. पो.स्टे. बिडकीन येथील खुनाचा गुन्हा उघडकीस आणले बाबत. रामेश्वर रेंगे, पो.नि. संतोष माने, सपोनि, जगदीश मोरे, विजय जाधव, पो.उपनि. पो.अं. नरेंद्र खंदारे, राहुल गायकवाड. पो.स्टे. शिल्लेगाव खुनाचा गुन्हा तसेच 04 इलेक्ट्रीक मोटार चोरीचे गुन्हे उघडकीस आणले. पो.नि. मच्छिंद्र सुरवसे, पो.अं. श्रीकृष्ण दाणी, संतोष धाटबळे, उमेश गुडे, हनुमंत सातपुते, विनोद पवार, रमेश अवसनवाड. पो.स्टे. एम. पैठण :- खुनाचा गुन्हा उघड करण्यात आला. स.पो.नि. भागवत नागरगोजे, पो.अं. सिंघल, घाटेश्वर, उगले. पो.स्टे. सोयगाव :- घर फोडी चा गुन्हा उघडकीस आणला बाबत. स.पो.नि. सुदाम सिरसाठ, पो.उप.नि. सतिष पंडीत, पो. अंम. ज्ञानेश्वर सरताळे, राजु बरडे.

वरील प्रमाणे उत्कृष्ट व उल्लेखनिय कामगिरी करून व गंभीर स्वरूपाचे गुन्हयांत आरोपीतांना अटक केल्याबद्दल पोलीस अधिकारी व कर्मचारी यांचा पोलीस अधीक्षक, औरंगाबाद ग्रामीण यांनी प्रशस्ती पत्रक देवुन अभिनंदन केल. सदरची बाब इतर अधिकारी व कर्मचारी यांना उत्कृष्ट कामगिरी करण्याकरिता निश्चितच प्रोत्साहन व स्फूर्ती देईल.



# पूर्णेचा पूर ओसरला; जळगाव जामोद-नांदुरा मार्ग वाहतुकीसाठी झाला खुला

आधुनिक केसरी न्यूज

**सागर झनके**

**माणेगाव :** गेल्या दोन दिवसापासून पुर्णा नदीला पूर असल्यामुळे जळगाव जामोद - नांदुरा मार्ग वाहतुकीसाठी बंद होता. 20 जुलैच्या रात्रीच पुलावरून पाणी कमी झाल्याने आज सकाळपासूनच पुलावरून वाहतूक सुरू झाली आहे.

18 तारखेपासून पुर्णा नदीला पूर असल्यामुळे जळगाव जामोद - नांदुरा या दोन तालुक्याला जोडणाऱ्या पुर्णा नदीवरील पूल पाण्याखाली गेला होता. त्यामुळे पुलावरून होणारी वाहतूक पुर्णतः ठप्प झाली होती. सतत दोन दिवस पुलावरून पाणी वाहत असल्याने प्रवाशांना पर्यायी मार्गाचा अवलंब करावा लागला होता. 19 जुलैच्या दुपारपासूनच पुर्णा नदीचा पूर ओसरायला सुरवात झाली होती.

त्यामुळे आज 20 जुलै रोजी पुर्णा नदीचा पूर पुर्णतः ओसरला असून आज सकाळपासूनच सदर पुलावरून वाहतूक सुरू झाली आहे. त्यामुळे दोन दिवसापासून बंद असलेला जळगाव जामोद - नांदुरा मार्ग आज वाहतुकीसाठी खुला झाला आहे.

# स्वप्नील गुडेकर समाजभूषण पुरस्काराने सन्मानित

आधुनिक केसरी न्यूज

**अहमदनगर :** येथे साप्ताहिक उपदेशक यांच्या 16व्या वर्धापनदिना निमित्त पुरस्कार वितरण सोहळा आयोजित करण्यात आला होता. या पुरस्कार वितरण सोहळ्यासाठी संपूर्ण महाराष्ट्र मधून एकूण 20 जणांची निवड करण्यात आली होती. यामध्ये औरंगाबाद चे युवा सिनेकलाकार (अभिनेते) व क्रीडा शिक्षक स्वप्नील चिंतामण निर्मला गुडेकर यांना समाजभूषण पुरस्कार 2022 देऊन सन्मानित/गौरविण्यात आले.

स्वप्नील यांनी मालिकेत, चित्रपट, वेब सिरीज, राष्ट्रीय सॉफ्टबॉल, राष्ट्रीय FLOORBALL खेळाडू + पंच असून त्यांनी क्रीडा व कला क्षेत्रात आपली कला सादर करीत आपली समाजासमोर एक उत्कृष्ट/अभिमानास्पद ओळख निर्माण केली आहे. त्यांच्या ह्या कलेची जाण ठेवत व कलेची पोचपावती म्हणून त्यांना पुरस्कार देऊन सन्मानित केले आहे.

या कर्यकमाचे उदघाटन धर्मगुरू बिशोप रेव्ह. M.U.KASAB यांच्या हस्ते झाले व नगर जिल्ह्याचे महापौर सौ.रोहिनीताई शेंडगे, जॉर्ज खेत्रे (संपादक) यांची प्रमुख उपस्थिती होती व त्यांच्या शुभहस्ते पुरस्कार वितरण करण्यात आले. या अभिमानास्पद कामगिरीबद्दल प्रभुदास अक्साल, चिंतामण गुडेकर, निर्मला गुडेकर, विद्या शिंदे, प्रमिला ताई, प्रा.संतोष अवचार, पुनम लहरे, चेतन पाटील, भाऊसाहेब कांबळे, प्रवीण शिंदे, मयूर सोनावणे (अभिनेते), संदीप जमधडे (उद्योजक) यांनी त्यांचे अभिनंदन केले.


# वाईन शॉपवर धिंगाणा करत पैसे हिसकावले, एकाला अटक

आधुनिक केसरी न्यूज

**धुळे :** देवपुरातील एका वाईन शॉप येथे दारुचे पैसे मागितल्याचा राग येवून एकाने दारूच्या बाटल्या रोडवर फोडत आरडाओरड करीत गोंधळ घातला, तसेच दादा असल्याचे सांगत एकाच्या खिशातून ४ हजार रुपयांची रोकड बळजबरीने हिसकावून घेतली. याप्रकरणी देवपुर पोलिसांनी नरेश कांतीलाल गवळी याला अटक केली आहे.

याबाबत देवपुर पोलिस ठाण्यात दुर्गेश राजु शंकपाळ रा. अरुणकुमार वैदय नगर, साक्रीरोड, धुळे यांनी फिर्याद दिली आहे. त्यानुसार, दि.१९ रोजी रात्री ९.४५ ते १० वाजेच्या दरम्यान नरेश गवळी हा महाराष्ट्र वाईन शॉप या दुकानात आला. त्याने ३ क्वाटर व्हिस्कीच्या बाटल्या मागितल्या. त्या दिल्यानंतर पैसे मागितले असता राग येवून त्याने दोन क्वाटर रस्त्यावर फेकून फोडल्या. तसेच मी या परिसराचा दादा आहे, माझेकडून पैसे मागतात का दुकान फोडून टाकेल असे बोलून शिवीगाळ, दमदाटी केली. दुकानात निलेश वंजारी हा स्कुटीवर दुकानाकडे येत असतांना वाईन शॉप दुकानाच्या थोड्या अंतरावर अडवून त्यालाही शिवीगाळ करीत त्याच्या खिशातील ४ हजार २३० रुपये बळजबरीने हिसकावून नेले. याप्रकरणी नरेश कांतीलाल गवळी रा. नगावबारी देवपूर याच्याविरुध्द भादवि कलम ३९२, ३४१, ४२७ प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला असून त्यास पोलिसांनी अटक केली आहे.

# सौंदर्याचा सल्ला





डॉ. उज्ज्वला दहिफळे
(एम.सी.एच.प्लास्टिक सर्जरी)
ॲस्थॅटिक, लेसर ॲण्ड प्लास्टिक सर्जन

## लेसर उपचार

आधुनिक केसरी

**शरीरावर :** हनुवटी, ओठावर, कपाळ, कान, मान, काख, हात आणि पायावर, छातीवर व पाठीवर तसेच जांगेत असलेल्या केसांवर लेसरने कायस्वरुपी उपचार केला जाता. भुवया व दाढी कायमची कोरता येते.

**लेसरचे तत्व :** यामध्ये अतिविक्रलहरी त्वचेवर सोडल्या जातात व ही किरणे केसांच्या मुळांमध्ये सोडली जातात व केशमुळे निकामी होतात. मात्र, त्वेचला कोणतीही इजा होत नाही.

**उपचार पद्धती :** केसांच्या जाडीवर व ते कोणत्या भागांवर आहेत, यावर आवलंबून असते.

**उपचारापुर्वी घ्यावयाची काळजी :** कमीत कमी १५ दिवस वॅक्सिंग, भेंडींग, डिपीलेटरी क्रीम अथवा ब्लिचिंग केलेले नसावे, शेव्हींग किंवा क्लिपिंग चालते. तारुण्यपिटीका किंवा मोठ्या व त्यामुळे पडलेले खड्डे व चेहऱ्यावरील वांग यावर अतिशय चांगला उपचार लेसरमुळे करता येतो.

**चेहऱ्यावरील सुरकुत्या (फेशियल रिज्युविनेशन) :-** यामध्ये चेहऱ्यावरील सुरकुत्या नाहीशा होतात व चेहऱ्यावर टवटवीतपणा येतो. हा परिणाम कायमस्वरुपी असतो.

**ॲस्थेंटीक सर्जरी (कॉस्मेटीक सर्जरी) :-** यामध्ये खालील बाबींवर उपचार करता येतात. अनावश्यक चरबी काढून शरीर सुडौल बनविणे, नाकाचे व्यंग दूर करणे, केस ट्रान्सप्लांट (केशारोपण) चेहऱ्याला नवकांती देणे.

**प्लास्टिक सर्जरी :-** जन्मतःचे व्यग, त्वचेवरील डाग व व्रण, भाजल्याने निर्माण झालेले व्यंगे व आखडलेले सांधे, हातावरील दुखापत/ इजा चेहरा व जबडयाचे फॅक्चर, चेहरा, तोंड व स्तनाची कॅन्सर सर्जरी.

**वंध्यत्वावर मायक्रोसर्जरी (ट्युबोप्लास्टी) :-** या सर्व सुविधा मराठवाड्यात प्रथमच डॉ. दहिफळे युरॉलॉजी ॲण्ड प्लास्टिक सर्जरी हॉस्पीटलमध्ये उपलब्ध आहेत.

संपर्क : डॉ. दहिफळे युरॉलॉजी ॲण्ड प्लास्टीक सर्जरी हॉस्पीटल, जिल्हा न्यायालयासमोर, अदालत रोड, बाबा पेट्रोल पंपाजवळ, औरंगाबाद, मोबा. : 9850822648, फोन 0240-2364858
Email : drvijaydahiphale@gmail.com,
Website : www.dahiphalecosmeticurology.com



# जिल्ह्यात देवगाव पोलीस ठाणे प्रथम क्रमांकावर

आधुनिक केसरी न्यूज

**बहादुर चव्हाण**

**देव्हारी :** छत्रपती संभाजी नगर ग्रामीण पोलीस अधीक्षक मनीष कलवानिया तसेच अप्पर पोलीस अधीक्षक डॉ. पवन बनसोडे यांच्या हस्ते प्रशस्ती पत्र व समान चिन्ह देऊन पोलीस ठाण्याचे सपोनी अमोल मोरे सन्मानित करण्यात आले तसेच 3 मोटारसायकल चोरीचे गुन्हे उडकीस आणले. यावेळी देवगाव पोलीस ठाण्याचे सहायक पोलीस निरीक्षक अमोल मोरे यांचा वरिष्ठांनी सन्मान करून शुभेच्छा दिल्या.

काही गुप्त गोष्टी
कुणाला सांगता येत नाहीत
(रविवारी मोफत तपासणी)
नस कमजोरी, शिघ्रपतन, शुक्रजंतू कमी,
वांझपणा असल्यास भेटा..!
(33 वर्षात 1 लाख 60 हजार रूग्णांना मार्गदर्शन व उपचार केल्याचा अनुभवासह 150 पुरस्कारानी सन्मानीत)



डॉ. शेख ए.एच.
नवजीवन
आयुर्वेदिक डिस्पेन्सरी
सेंट्रल बसस्टँड समोर, हॉटेल मिर्झा जवळ, औरंगाबाद.
फोन : (0240) 2350042, मो. : 9021111549 www.drshaikhah.in